
# वसई विरार शहर महानगरपालिका

## पर्यावरण सद्यस्थिती अहवाल

## २०१४-२०१५










# वसईचा किल्ला

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पूर्व)**
**ता. वसई, जि. पालघर, पिन-४०१ ३०५**

**दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६**
**फॅक्स : ०२५०-२५२५१०७**
**ई -मेल : vasaiviracorporation@gmail.com.**

**जा.क्र. : व.वि.श.म./**
**दिनांक :**



# पर्यावरण पुष्प

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील वास्तव्य करणाऱ्या नागरिकांना प्रदूषणमुक्त जीवनमान देण्याकरिता महाराष्ट्र शासन व इतर सर्व संबंधित संस्था सतत कार्यरत आहेत. या महानगरपालिका हद्दीतील हवा, जल, माती व ध्वनी यांच्या होणाऱ्या प्रदूषणाची सद्यपरिस्थितीतील पातळीची तपासणी करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी पर्यावरण अहवाल बनविण्याचे काम मे. स्कायलॅब ॲनालिटीकल लॅबोरेटरीला देण्यात आले असून त्यांनी या शहराचा सर्वसमावेशक अहवाल सादर केला आहे. हा अहवाल नागरिकांच्या मनात पर्यावरण संवर्धन व संरक्षण करण्यास जागृती निर्माण करण्याचे महत्त्वाचे काम करेल.

**मा. श्री. गोविंदजी राठोड**
**आयुक्त,**
**वसई - विरार शहर महानगरपालिका**

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पूर्व)**
**ता. वसई, जि. पालघर, पिन-४०१ ३०५**

**दूरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६**
**फॅक्स : ०२५०-२५२५१०७**
**ई -मेल : vasaiviracorporation@gmail.com.**

**जा.क्र. : व.वि.श.म./**
**दिनांक :**



# पर्यावरण पुष्प

वसई-विरार शहर महानगरपालिकेची प्रथम महिला महापौर या नात्याने शहरातील पर्यावरण संतुलित रहावे याकरिता महानगरपालिका व इतर सर्व संबंधित संस्थांच्या सहकार्याने आवश्यक उपाययोजना करण्यासाठी मे. स्कायलॅब ॲनालिटीकल लॅबोरेटरी यांनी सादर केलेला अहवाल उपयुक्त ठरणार आहे.

शहरातील सामाजिक संस्था व नागरिकांचा पर्यावरण संवर्धन व संरक्षण कामी सहभाग असावा यादृष्टीने महानगरपालिकेमार्फत विशेष प्रयत्न करण्यात येतील

**मा. सौ. प्रविणा ठाकूर**
**महापौर,**
**वसई - विरार शहर महानगरपालिका**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पान नं. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ |
| २. | परिचय (भाग १) | ४ |
| ३. | प्रशासकीय आस्थापना (भाग २) | ११ |
| ४. | पर्यावरण सद्यस्थिती (भाग ३) | १३ |
| ५. | भूपर्यावरण | १४ |
| ६. | जल पर्यावरण | २३ |
| ७. | वायू पर्यावरण | ३४ |
| ८. | ध्वनी प्रदूषण | ३९ |
| ९. | प्रदूषण नियंत्रण संस्था आणि त्याबाबतचे कायदे (भाग ४) | ४५ |
| १०. | वैद्यकिय आरोग्य विभाग व शैक्षणिक सुविधा (भाग ५) | ४८ |
| ११. | आपत्ती व्यवस्थापन (भाग ६) | ५२ |
| १२. | शैक्षणिक सुविधा (भाग ७) | ५७ |
| १३. | शहर सुशोभिकरण (भाग ८) | ५८ |
| १४. | पर्यावरण अहवाल - एक दृष्टिक्षेप (भाग ९) | ६९ |
| १५. | वृक्ष संवर्धन (भाग १०) | ७० |
| १६. | महापालिकेचे उपक्रम व योजना, परिवहन सेवा (भाग ११) | ७९ |
| १७. | मॅरेथॉन स्पर्धा | ८३ |

# ✣ प्रस्तावना ✣


राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार खंड २३४ परिच्छेद १ सन १९९२ महाराष्ट्र राज्य नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्था सल्लागार अधिनियम १९९४ खंड ६७ अन्वये महापालिका क्षेत्राचा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करणे अपरिहार्य आहे.

व.वि.श.म.पा. क्षेत्राचा सन २०१४-१५ चा पर्यावरण सद्यस्थिती अहवाल सादर करतांना आम्हाला आनंद होत आहे.

हा अहवाल तयार करतांना, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचा पर्यावरण अहवाल तयार करण्यासाठी असलेल्या मार्गदर्शक बाबींचा समावेश करुन जास्तीत जास्त मार्गदर्शक होईल याचा प्रयत्न केला आहे.

सदर अहवाल पूर्ण करणेकामी व.वि.श.म.पा. चे **मा. आयुक्त श्री. गोविंदजी राठोड व मा. उपायुक्त श्री. अजिज शहा** तसेच म.प्र.नि.मं. यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

**(स्काय लॅब ॲनालॅटिकल लॅबोरेटरी)**




**वसई विरार महानगरपालिकेचा पर्यावरण सद्यःस्थिती अहवाल तयार करण्यासाठी वापरण्यात आलेली पध्दत :**

पर्यावरण सद्यस्थिती अहवाल तयार करतांना २०१२-२०१३, २०१३-२०१४ आणि २०१४-२०१५ या तीन वर्षाच्या अहवालाचा आढावा घेण्यात आला.


पुढील अहवालातील निष्कर्ष तिसऱ्या प्रकरणात देण्यात आले आहेत.

डीएसपीआयआर खर्डा स्वरुपातील माहितीची पुर्नमांडणी आणि विश्लेषण हया आराखडयाप्रमाणे करण्यात आले. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नमुना अनुक्रमाप्रमाणे संपूर्ण अहवालाची पुर्नमांडणी करण्यात आली आहे.

त्याशिवाय या अहवालामध्ये शहरातील पाणी पुरवठा, जलनिःसारण, मलनिःसारण, घनकचऱ्याचे व्यवस्थापन, दळणवळण आणि वाहतूक या पायाभूत सुविधा समाविष्ट केल्या आहेत. शहराचे बदलते स्वरुप लक्षात घेवून त्याप्रमाणे असलेली पायाभुत सुविधांची सद्यःस्थिती आणि भविष्यातील तरतूद याचा आढावा देखील घेतला आहे. पर्यावरण सद्यःस्थितीचा या अहवालामध्ये कार्बन फुटप्रिंटचा आढावा घेण्याचाही प्रयत्न होत आहे. जगामध्ये कार्बन फुटप्रिंट या विषयाला महत्त्व प्राप्त होत आहे. वाहतूक व उर्जा या दोन महत्त्वाच्या घटकावर आधारलेल्या पर्यावरण विषयक विविध घटकांचा सखोल आढावा घेतल्यानंतर जी वस्तुस्थिती समोर येते.

भारताच्या घटनेमध्ये घटना दुरुस्ती क्र. ७४ ने सन १९९२ मध्ये नगरपालिका व महानगरपालिकांची कर्तव्ये व भूमिका स्पष्ट केली आहे. या दुरुस्तीच्या १२ व्या परिशिष्टात कामकाजाचे स्वरुप स्पष्ट केलेले आहे. पर्यावरण संरक्षण, परिसर व शहरी जंगलराजी संवर्धन यांचा यामध्ये समावेश आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने महापालिका कायद्यात दुरुस्ती करुन अध्यादेश क्र. १२ सन १९९४ जारी केला. यामध्ये कलम ६१ (अ, ब) सन १९९४ नुसार पर्यावरण संरक्षण, परिसर संवर्धन तसेच शहरी जंगलाचे संवर्धन करणे ही नगरपालिका व महानगरपालिकांची आद्य कर्तव्ये आहेत.

**क्षेत्र वर्णन :**



# भाग - १

# परिचय

## अ) शहराचा परिचय

## ब) भौगोलिक स्थान

## क) हवामान

## ड) लोकसंख्या

## इ) ऐतिहासिक महत्त्व

## ई) अर्थव्यवस्था

भाग १

## अ) शहराचा परिचय

वसई विरार महानगरपालिका सुमारे ६ वर्षांपूर्वी अस्तित्वात आली. वसई विरार शहर महानगरपालिकेची वसई तालुक्यातील तत्कालीन वसई, विरार, नवघर, माणिकपुर व नालासोपारा या चार नगरपालिका व ५३ गावे मिळून हि महानगरपालिका दिनांक ३ जुलै २००९ रोजी अस्तित्वात आली सन २०११ च्या जनगणनेनुसार व.वि.श. महानगरपालिका क्षेत्राची लोकसंख्या १८,०७,६२५ इतकी होती.

या महानगरपालिकेचे भु.क्षेत्र विभाजन हे ५ प्रभाग क्षेत्रामध्ये विभागले गेले आहे ते खालीलप्रमाणे-

| **प्रभागाची नावे** | **समावेश** |
|---|---|
| अ | बोळींज |
| ब | पेल्हार |
| क | नालासोपारा |
| ड | नवघर- माणिकपुर |
| इ | वसई |

## ब) भौगोलीक स्थान

भौगोलीक दृष्टया वसई विरार श.म.पा. ही पूर्वेला ७२° अंश ४८ अंश पूर्व रेखांशावर तसेच उत्तरे १९°, २८ ते १९° ४८ उत्तर अक्षांशावर वसलेली आहे.

वसई विरार शहराच्या उत्तरेस वैतरणा नदी आहे, दक्षिणेस वसई खाडी आहे. आणि पश्चिमेस अरबी समुद्र आहे. शहराच्या पूर्वेकडे जंगलांनी व्यापलेल्या तुंगार पर्वत रांगा आहेत.

या क्षेत्राची समुद्र सपाटी पासूनची उंची ११ मीटर इतकी आहे.

भूशास्त्रीयदृष्टया हा प्रदेश दख्खनच्या लाव्हा पठारामध्ये येतो.

**व.वि.श. महानगरपालिकेच्या अंतर्गत येणारी गावे :**

१. आगाशी २. बापने, ३. भुईगाव ४. बिलाल पाडा ५. बोलिंज ६. चंदनसार ७. चांदीप ८. चिखल डोंगरी ९. चिंचोटी १०. छोबरे ११. दहिसर १२. धानिव १३. देवदत्त १४. गास १५. गास कोपरी १६. गिरीज १७. गोखिवरे १८. जुचंद्र १९. कामन २०. काने २१. खर्डी २२. करमाहे २३. कसराली २४. काशिद कोपर २५. कौलर २६. किरवली २७. कोफरड २८. कोल्ही २९. कोशिम्बे ३०. मांडवी ३१. मारदेस ३२. मुळगांव ३३. नायगंव ३४. नाले ३५. ललावे ३६. निर्मल ३७. पेल्हार ३८. राजवाली ३९. राजोडी ४०. सालोली ४१. संदूर ४२. सासूनवपर ४३. सातीवलवी ४४. शीरगाव ४५. शिरशाद ४६. उमेला ४७. उमराले ४८. वाडवली ४९. वाघीली ५०. वेतार ५१. वालीव.

## क) हवामान

वसई - विरार शहराचे हवामान उष्ण व दमट आहे लांबलचक समुद्रकिनारा आणि उच्चसापेक्ष आर्द्रता यामुळे तापमानातील फरक लक्षणीय नसतो. येथे मुलतः तीन मोसम असून दरम्यानचा संक्रमण कालावधी सुमारे १५ दिवस इतका असतो.

**हिवाळा :**

हा ऋतू ऑक्टोबर ते जानेवारी या दरम्यान असतो आणि सुमारे ७७ ते ८५ टक्के इतक्या सापेक्ष आर्द्रतासह या मोसमातील सरासरी कमाल तापमान २८° सें व सरासरी किमान १६° सें इतके असते.

**उन्हाळा :**

हा ऋतू फ्रेब्रुवारी ते मे या दरम्यान असतो आणि सुमारे ६० टक्के इतक्या सापेक्ष आर्द्रतेसह या मोसमातील सरासरी कमाल तापमान सुमारे ३४° सें व सरासरी किमान तापमान २६° सें इतके असते.

**पावसाळा :**

हा ऋतू जुन ते सप्टेंबर हया दरम्यान असतो. नैऋत्य मोसमी पाऊस जुनच्या पहिल्या आठवडयात सुरु होतो. वार्षिक सरासरी पर्जन्यमान सुमारे २२०० मी.मी. इतके आहे. या ऋतूत ८० ते ८५% से इतक्या सापेक्ष आर्द्रतेसह सरासरी कमाल तापमान ३०° सें आणि सरासरी किमान तापमान २४° सें इतके असते.

# ड) लोकसंख्या

लोकसंख्येचा शास्त्रीय अभ्यास हा लोकसंख्येची रचना गुणधर्म व त्याचे वर्गीकरण व काळानुरुप बदल यांचे घटक आहे. बरेचसे लोक आजुबाजुच्या गावातून, राज्यातून, शहरातून स्थलांतरीत होत असतात. स्थलांतरीत लोकांचा जन्मदर, मृत्युदर, एक दशकातील लोकसंख्या वाढीचा दर यांचा अभ्यास करुन आपण भविष्यातील लोकसंख्या वाढीचा अंदाज करु शकतो.

२००१-२०१० या दशकातील महाराष्ट्र राज्याचा लोकसंख्या वाढीचा दर हा ६.७४% दराने कमी झाला आहे. तुलनेने देशाच्या लोकसंख्या वाढीचा दर हा ३.८% ने कमी झाला आहे. आपल्या महाराष्ट्र राज्यातील हा सर्वात अधिक घटलेला लोकसंख्या दर आहे. वसई-विरार शहर महानगरपालिकेतील लोकसंख्या वाढीचा दर हा २००१ ते २०१० दशकामध्ये जास्त आहे. म्हणजेच २००१ मध्ये लोकसंख्या ६,३७,६२८ होती व २०१०-११ मध्ये ती १८,०७,६२५ झाली तुलनेने ती १००% वाढ झाली आहे. याचे कारण म्हणजे २००१ ते २०१०-११ या काळात वसई - विरार शहर क्षेत्रात लक्षणीय विकास झाला असून याचे श्रेय साहजिकच येथील जागृत राजकिय इच्छाशक्ती, कुशल प्रशासन, सजग लोकप्रतिनीधी व स्वयंसेवी संस्था यांना जाते.

### वसई विरार शहराची लोकसंख्या :

स्थलांतरीत लोकांचा जन्मदर, मृत्यूदर, एका दशकातील लोकसंख्या वाढीचा दर यांचा अभ्यास करुन २०११ या जनगणनेनुसार वसई - विरार शहरांची लोकसंख्या ही १८,०७,६२५ इतकी होती. त्यात पुरुषांची लोकसंख्या ६,४९,४८६ तर स्त्रियांची लोकसंख्या ५,७१,६९८ एवढी होती.

२०११ च्या जनगणनेनुसार वसई विरार शहरातील लहान मुलांची लोकसंख्या १,३७,३४३ इतकी होती. त्यांत ७१,७१६ मुलांची संख्या आणि ६५,६२६ इतकी मुलींची संख्या आहे. एकूण लोकसंख्येच्या ११.२५ टक्के लोकसंख्या ही लहान मुलांची लोकसंख्या आहे.

स्त्री पुरुष प्रमाण (२०११ च्या .जनगणनेनुसार) वसई विरार शहराचे २०११ च्या जनगणनेनुसार १००० पुरुषांप्रमाणे खालीलप्रमाणे -

१००० पुरुषांमागे ८८० स्त्रीया, १००० मुलांमागे ९१५ मुली, लहान मुलांचे प्रमाण

२०११ च्या जनगणनेनुसार भारतरच्या तुलनेत वसई विरार शहराची लोकसंख्या ७०.०४ टक्के आहे.

**स्त्रोत : व.वि.श.म.पा. टिप्पणीनुसार**

## वसई विरार शहराच्या साक्षरतेचे प्रमाण

एखाद्या क्षेत्राचा मानवी विकास व त्याची आर्थिक परिस्थिती ही त्या भागातील साक्षरतेचे प्रमाण दर्शविते. शहरी क्षेत्रात हे प्रमाण ९१.१५% आहे. त्यात पुरुषांची साक्षरता ९४.८६% आहे. तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ८६.९०% आहे. ग्रामीण क्षेत्रात हे प्रमाण ७७.८०% आहे. यात ८५.२७% पुरुष तर ७०.०६% स्त्रीयांचे प्रमाण.

एकूण साक्षरता ही ९,८७,९१६ इतकी आहे. त्यात ५,४८,१३८ पुरुष व ४,३९,७७८ स्त्रीयांची संख्या आहे.

| तपशिल | एकूण | पुरुष | स्त्री |
|---|---|---|---|
| शहरी साक्षरतेचे प्रमाण | ९१.१५ % | ९४.८६% | ८६.९०% |
| ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण | ७७.८०% | ८५.२७% | ७०.०६% |

## इ) ऐतिहासिक महत्त्व

वसई विरार प्रदेश हा उत्तर कोकण प्रांताचा भाग असून तो ऐतिहासिक काळात सोपारा म्हणून ओळखला जात असे. बौद्ध साहित्यात असा उल्लेख आहे की, इ.स. पूर्व ५४० मध्ये सोपारा हे मोठे व्यापारी आणि धार्मिक शहर होते.

**ऐतिहासिक ठिकाणे :**

वसईचा किल्ला हा गुजरातचे बहादूर शाह यांनी बांधावयास सुरुवात केली व पोर्तुगीजांनी तो पूर्ण केला. जिवदानी मातेचे मंदीर, तुंगारेश्वर मंदीर, बौद्ध स्तूप, अर्नाळा किल्ला, रमेदी चर्च, जैन मंदीर, हातीमोल्ला, जामा मसजीद ही प्रमुख पर्यटन स्थळे वसई विरार शहराला लाभलेली आहेत.



बौद्ध स्तूप



जैन मंदिर



अर्नाळा किल्ला



जिवदानी मातेचे मंदिर

# ई) अर्थव्यवस्था

स्वातंत्र्योत्तर काळात लोकांनी आपापसात संपर्क साधून व्यापारसंबंध प्रस्थापित केले की ज्यामुळे या भूभागाच्या भरभराटीस पुन्हा सुरुवात झाली. १९७० पर्यंत वसई हा एक शेती प्रधान विभाग म्हणून ओळखला जात होता, जो उत्कृष्ट प्रकारच्या भाज्या स्थानिक लोकांच्या गरजेप्रमाणे उत्पादित करत होता.या शहरातील मुख्य पीके म्हणजे तांदुळ, केळी, पोफळी, फुले, नारळ आणि भाजीपाला.

१९८० पासून या शहरात मोठमोठ्या इमारती उभारल्या गेल्या ज्यामध्ये मुंबईकडील कंपन्यांच्या शाखा, उपशाखा आणि कार्यालये सुरू झाली, परंतु अचानक वाढलेल्या भूक्षेत्र विकासामुळे जंगलांनी व्यापलेल्या भूक्षेत्र आणि ओलीता खालची जमीन याची मोठया प्रमाणावर हानी झाली.


येथील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. परंतु पूर्व भागातील स्थानिक लोक नोकरी करुन आपला उदर निर्वाह करणारे आहेत.

## भाग २


# प्रशासकीय आस्थापना

व.वि.श.म.पा. ही नागरी संस्था ३ जुलै २००९ रोजी **"प्रगतीचा प्रकाश, हाच बहुजन विकास"** हे ब्रीद वाक्य घेऊन अस्तित्वात आली की, जी या शहराचा व्यवहार पाहते. ही महानगरपालिका वसई, विरार, नालासोपारा व नवघर माणिकपूर या भूतपूर्व नगरपरिषदा तसेच ५३ ग्रामपंचायतींच्या एकत्रिकरणाव्दारे बनलेली आहे. या क्षेत्रा अंतर्गत एकूण ८९ प्रभाग आहेत.

**वसई - विरार शहर महानगरपालिका**



# वसई - विरार शहर महानगरपालिका




प्रभारी सहाय्यक आयुक्त यांचे नियंत्रणाखाली असलेल्या कर्मचाऱ्यांमार्फत दैनंदिन कचरा वाहतूक, गटारे साफसफाई, डास किटक नियंत्रणाकामी औषध फवारणी व वैद्यकीय आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा, जन्म-मृत्यु व इतर दाखले, परवाने, एल.बी.टी व घरपट्टी, पाणीपट्टी आकारणे, उद्याने व स्मशानभूमींची देखभाल व वापर करणे अशी व इतर अनुषंगिक दैनंदिन कामे केली जातात. तसेच विकास कामांतर्गत रस्ते, गटारे, समाजकेंद्रे, शौचालये बांधणे, इमारती बांधणे, बाजारपेठा, मंडई असे सार्वजनिक उपक्रम राबविले जातात.

महापालिकेने पर्यावरणाचे महत्व लक्षात घेता, एक स्वतंत्र पर्यावरण विभाग सुरू केला आहे. त्याचे कामकाज पाहण्याचे काम पयार्वरणप्रेमी तसेच पर्यावरण तज्ञ श्री. सुखदेव दरवेशी यांचेकडे सोपवले आहे. या अंतर्गत या विभागाने पर्यावरण संतुलन तसेच प्रदुषण नियंत्रण करण्यासाठी निरनिराळया योजना राबविण्याचे ठरविले आहे. त्यामधील एक म्हणजे **'वृक्षसंवर्धन व वृक्ष लागवड'** तसेच पालिका क्षेत्रातील शाळांमध्ये जाऊन पर्यावरण प्रदुषण नियंत्रण आणि संतुलन या विषयावर व्याख्याने देवून नविन पिढीमध्ये पयार्वरणासंबधी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# भाग ३

# पर्यावरण सद्यस्थिती

## अ) भूपर्यावरण

## ब) जल पर्यावरण

## क) वायू पर्यावरण

## ड) ध्वनी पर्यावरण

# भाग ३

# पर्यावरण सद्यस्थिती

## अ) भूपर्यावरण

महापालिका क्षेत्रात भूपर्यावरणाचा अभ्यास करताना मुख्यत्वे करुन घनकचरा व्यवस्थापन, घनकचरा विल्हेवाटीच्या प्रस्ताविकरण यांचा समावेश होतो . वृक्षतोड, जमिनीची धूप व माती नष्ट होवून सिमेंटची जंगले वाढत चालली असल्याने भविष्यातील भूपर्यावरणावर ताण पडू शकतो व.वि.श.म.पा. ची काही वर्षांपूर्वी काही लाखात असलेली लोकसंख्या आज अधिक झाल्याने व २०२० साली ती २० लाखांवर जाण्याची शक्यता असल्याने लोकसंख्येची घनता वाढून भूपर्यावरणावर अधिक ताण पडू शकतो.

मोठया प्रमाणावर होणारी नवीन बांधकामे, विकासकांबरोबर वाढणारे औद्योगिकीकरण व त्यामुळे मोठया प्रमाणावर होणारे सांडपाणी सक्षम प्रक्रिया न करताच सोडून देणे व त्याचबरोबर कचऱ्यांचे ढिगारे साचून त्याची योग्य प्रकारे शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट न लावल्याने, तसेच अपुऱ्या घनकचरा व्यवस्थापनेमुळे देखील भूपर्यावरणावरील ताण सतत वाढत चालला आहे

**भू - रचना शास्त्र**

वसई तालुक्यात रेगुर मृदा आढळते ती सुपीक व भाजी उत्पादनास उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे ही मृदा भात शेती व फुलांच्या शेतीस सुध्दा उपयुक्त आहे.  वसई ही सुपीक भूक्षेत्र म्हणून सुध्दा नावारुपास आली आहे.

## घनकचरा व्यवस्थापन




### नागरी घनकचरा -

बदलती जीवनशैली, वाढती कारखानदारी, वाढते तंत्रज्ञान यामुळे कचऱ्याच्या समस्या वाढल्या आहेत. या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्याचा विपरीत परिणाम आरोग्य व पर्यावरण यावर होऊ शकतो, त्यामुळे ती एक महत्त्वाची बाब आहे. माहितीचा अभाव, सभोवतालच्या स्वच्छतेचे महत्त्व व पुढाकार न घेतल्यामुळे कचरा गोळा करणे व त्यांची विल्हेवाट लावणे ही समस्या बनली आहे. इतर पर्यावरणाच्या समस्यांपैकी  घनकचरा व्यवस्थापन ही समस्या सोडवणे महानगरपालिकेपुढील आव्हान आहे.

### घनकचरा व्यवस्थापन :

तत्कालीन वसई, विरार, नालासोपारा व नवघर-माणिकपुर या चार नगरपरिषदांमध्ये निर्माण होणारा कचरा टाकण्यासाठी मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी मौजे-गोखिवरे येथील सर्व्हे नं ३० अ, ३१ व ३२ या जागेचे एकूण क्षेत्र २५.६६ हेक्टर आर पैकी १९.३३ हेक्टर आर जमिन तत्कालीन चार नगरपरिषदांकडे हस्तांतरीत केलेली आहे.

सदर ठिकाणी प्रदुषण निपयंत्रण मंडळाकडून मान्यता घेवून त्या ठिकाणी घनकचऱ्यावर प्रक्रिया करुन त्यामधून खत निर्मितीचा मे. हंजर बायोटेक (वसई)  प्रा. यांचा प्रकल्प २९ वर्षाचे करारावर बिओटी तत्वावर सुरु केलेला आहे.

सदर प्रकल्पाची क्षमता २५० टनाची आहे. दरम्यानच्या काळात महानगरपालिका स्थापन झाल्याने व जवळपास पाच वर्षात लोकसंख्या वाढीमुळे कचऱ्याचे प्रमाण वाढलले असून सद्या स्थितीत जवळपास ४५० ते ५०० टन कचरा निर्माण होतो. त्यामुळे सदर प्रकल्पाची क्षमता वाढविण्याचे आदेश सदर कंपनीस दिलेले आहे. तसेच भविष्यात कचऱ्याचे प्रमाण वाढणार असल्याने प्रत्येक विभागात घनकचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे. त्यामध्ये भाजी व मच्छी मार्केट मधील कचरा तसेच मटन मार्केट मधिल निघणारा कचरा गोळ करुन त्यावर प्रक्रिया करुन उर्जा निर्माण करुन वीज निर्मिती करण्यात येणार आहे.

त्याकरीता डॉ. भाभाग अणुसंशोधन केंद्र या मार्फत निसर्ग ऋण प्रकल्प व मिश्र घनकचरा (न जाळता) त्यापासून विद्युत निमिर्ती करणे बाबतचे प्रकल्प हाती घेऊन ठराव क्र. ९ दि. २०.०९.२०१० व ठराव क्र. ५ दि. ०४.११.२०११ नुसार सदर प्रकल्पांना मा. महासभेमध्ये मान्यता दिलेली आहे.

तसेच दैनंदिन कचरा संकलन व साफसफाई करिता महानगरपालिकेमार्फत रु. ७४,७३,५०,०००/- एवढी तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच सॅटेलाईर्ट सिटी योजनेअंतर्गत घनकचऱ्याकरीता रु. ७.१३ कोटी निधी प्राप्त झाला असून त्या मार्फत कचरा संकलनाकरीता ३५ कॉम्पॅक्टर व ७० टिप्पर तसेच २००० नग डस्टबिन खरेदी केलेले आहे.

## घनकचरा व्यवस्थापन (साफसफाई सेवा) :

| | | |
|---|---|---|
| **दररोज कचरा (टना मध्ये)** | : | ४५० ते ५०० टन प्रती दिन |
| **सफाई कामगार (संख्या)** | : | महानगरपालिकेचे कायम कामगार ४९८ व ठेक्या अंतर्गत अभिकर्त्याने नेमलेले २६९३ कामगार असे एकूण ३१९१ कामगार |
| **कचरा वाहतुक (वाहन संख्या)** | : | महानगरपालिकेचे ३५ कॉम्पेक्टर व ७० टिप्पर व अभिकर्त्याचे ४० डंप व १० ट्रॅक्टर असे एकूण १५५ वाहने |
| **कचरा विल्हेवाट (प्रकल्प / पध्दती)** | : | बि.ओ.टी. तत्वावर मे. हजर बायोटेक्स एनर्जी (वसई) प्रा.लि यांचा प्रकल्प कार्यान्वित. |
| **खतनिर्मिती** | : | २३० |
| **इंधन निर्मिती** | : | |
| **वीज निर्मिती** | : | |

**प्रगत परिसर व्यवस्थापन** :

**प्रसाधन गृहे** : १५६३ सिट

**धोबीघाट** :

**वार्षिक खर्च** : ७५,३४,००,०००/-

**एकूण घनकचरा निर्मिती व वाहतुकीचा तपशील पुढीलप्रमाणे**

| | नवघर | नालासोपारा | विरार | वसई | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| क्षेत्रफळ | १६ चौ.कि. | १४.२५ चौ.कि. | १९.४८ चौ.कि. | ८ चौ.कि. | ५८ चौ.कि. |
| स्वच्छता विभाग | १ | १४ | १५ | १ | ३१ |
| घनकचरा | ५५ टन | १२० टन | ७० टन | २४ टन | २६९ टन |
| कामगारांची संख्या (करार पध्दतीनुसार) | ४०७ | ५९० | ३९६ | १३७ | १५३० |

व.वि.श.म. ने कचरा गोळा करण्याचे काम खालीलप्रमाणे ठेकेदारांना दिले आहे.

**प्रभाग समिती अ, ब, क, ड, ई**

**वाहनांची माहिती**

| अ.क्र. | प्रभागाचे नांव | कॉम्पॅक्टर | डंपर | टिपर | टॅक्टर |
|---|---|---|---|---|---|
| १. | (अ) पूर्व / पश्चिम | ७ | ५ | १० | १ |
| २. | विरार पूर्व ब | ५ | २ | ५ | - |
| ३. | पेल्हार ब | २ | ११ | ४ | ३ |
| ४. | (क) पूर्व / पश्चिम | ११ | १६ | १५ | ४ |
| ५. | (ड) पूर्व / पश्चिम | ८ | १९ | ४ | ६ |
| ६. | (ई) | २ | ९ | ७ | २ |
| | **एकूण** | **३५** | **६२** | **४५** | **१६** |

सदर वस्तू तयार झाल्यानंतर उरलेल्या सुमारे २० टक्के इनर्ट कचऱ्याची विल्हेवाट त्याच ठिकाणी सॅनिटरी लँडफिल्ड साईटवर सदर संस्थेमार्फत करण्यात येत आहेत.




जमा केलेल्या कचऱ्याचे, ओला व सुका असे वर्गीकरण केले जाते. ओल्या कचऱ्यापासून सेंद्रिय खताची निर्मिती केली जाते. साधारणतः ८ टन एवढा ओला कचरा हा भाजी मंडई, मासे मंडई, हॉटेल इ. कडून निर्माण होतो.

**व.वि.म.पा.सेंद्रिय खत निर्मितीची ठळक वैशिष्टये -**

१. विघटनशील व अविघटनशील घन कचरा वेगळा केला जातो.

२. व.वि.म.पालिकेत रोजगार संधी उपलब्ध झाल्या आहेत.

३. शहरी सौंदर्यकरणासाठी बरेचसे आराखडे तयार केले आहेत.

४. घन कच-याची योग्यरीत्या विल्हेवाट लावल्याने त्यामुळे होणाऱ्या अपायांना आळा बसला आहे.

५. घन कचऱ्यापासून तयार झालेले सेंद्रिय खत हे विकले जाते किंवा गरजू शेतकऱ्यांना दिले जाते.

### जैविक कच-याच्या विल्हेवाट करण्याच्या सुविधा -

ठाणे जिल्हयात जैविक कचऱ्याच्या विघटनासाठी, कळवा येथील शिवाजी इस्पितळ व पालघर या दोन ठिकाणी सुविधा उपलब्ध आहेत. मार्च २००३ पासून कळवा येथील सुविधा कार्यरत आहे. तिथे ५० किलो/तास एवढी क्षमता असलेली कचरा जाळण्याची भट्टी व निर्जंतुकीकरण करण्याची सुविधा उपलब्ध आहे व.शि.म.पालिका क्षेत्रात जागेचा अभाव असल्याकारणाने व जैविक कचरा विघटन हा महत्वाचा विषय असल्यामुळे एमपीसीबी ने या भागातील जैविक कचरा विघटनासाठी कळवा येथील जैविक कचरा सुविधा केंद्रात पाठविण्याचा निर्णय दिला.

### घनकचरा निर्मूलनासाठी राबविले जाणारे उपाय :

#### पर्यावरण हा महानगरांमधील कळीचा मुद्दा

धूळ, धूर यांनी भरलेली हवा, वाहनांचा, बांधकामांचा सततचा आवाज, प्रदूषित झालेले पाणी, झाडावर पडणारी कुऱ्हाड, आक्रसत जाणाऱ्या मोकळया जागा या समस्यांची यादी न संपणारी आतापर्यंत त्याबद्दल सर्व पैलूंची चर्चा पार पडली. पण पर्यावरणाच्या या ऱ्हासामध्ये वैयक्तीक जबाबदारी कोणीही घेत नाही. कोणत्याही समस्येच्या निराकरणाची सुरुवात स्वतःपासून करता येते. स्वच्छता हा पर्यावरणाचा महत्त्वाचा पैलू. कचऱ्याची निर्मिती जिथे होते, तिथेच त्याची विल्हेवाट लावली तर पर्यावरणावरील भार खूप कमी होवू शकतो.

घनकचरा व्यवस्थापन ही सामूहिक जबाबदारी मानून अनेक पर्यावरणप्रेमी नागरिकांनी सोसायटी अथवा व्यक्तीगत पातळीवर निर्मूलन प्रकल्प राबवले आहेत. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नवे डंपिंग ग्राउंड शोधण्यापेक्षा आपल्याच घरात अथवा आवारात त्याचे व्यवस्थापन करणे, सोपे आणि अधिक पर्यावरण स्नेही आहे, हे या प्रयोगातून दिसून आले आहे.

एका ठिकाणी साचणारा कचरा दुसऱ्या ठिकाणी नेवून टाकणे ही कचरा व्यवस्थापनाची डंपिंग ग्राउंड पध्दत आता कालबाहय झाली आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, विरार, वसई, नालासोपारा आदी सर्वच शहरातील कचऱ्याच्या प्रश्नाने उग्र रुप धारण केले आहे. ओल्या अणि सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण व्यवस्थित होत नसल्याने डपिंग ग्राउंडवर कचऱ्याचे धड व्यवस्थापन होत नाही. या उलट सोसायटीच्या आवारात जैविक अथवा गांडूळ पध्दतीने ओल्या कचऱ्याचे नीट विघटन होवून त्याचे सेंद्रीय खतात रुपांतर होते. सोसायटीतील सुरक्षारक्षक, माळी वा अन्य मदतनीसांच्या पध्दतीने हा प्रकल्प राबविला जावू शकतो. हे काही सोसायटीतील नागरिकांनी दाखवून दिले आहे. प्रकल्पातून तयार होणारे खत हे आवारातील उद्यानासाठी वापरता येते. जास्तीचे खत बाजारात विकताही येते. सगळयात महत्त्वाचे म्हणजे कचरा डंपिंग ग्राउंडवर जात नाही.

**सूचना :**

**घनकचरा व्यवस्थापन आणि हाताळणी नियम २०००**

- डंपिंग ग्राउंडवरील कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावावी.
- घनकचरा वर्गीकरण मोहीमेअंतर्गत नागरिकांनी ओला व सुका कचरा वेगवेगळा दिला पाहीजे. परंतू अजूनही हवे तसे यश आलेले नसून सदर नियमांची म.प्र.नि.मं. (महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ) ची कडक अंमजबजावणी होणेसाठी महापालिकेने योग्य ती पावले उचलणे गरजेचे आहे.
- घनकचरा व्यवस्थापन आणि हाताळणी नियम २००० च्या अंतर्गत नियमांची कडक अंमलबजावणी करण्यासाठी स्वयंसेवीसंस्था, महिला बचत गट यांच्या सहभागाने म.प्र.नि.मं.व व.वि.श.म.पा. यांनी संयुक्तरित्या मोहीम राबवली पाहिजे. सदर मोहीमेत सातत्य असले पाहीजे.
- आयएमए च्या स्तरावर व.वि.श.म.पा. च्या संयुक्त बैठका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वारंवार घेणे आवश्यक आहे.

**उपाययोजना :**

घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० तरतुदीनुसार प्रत्येक महानगरपालिकेने त्यांच्या कार्यक्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनाबाबत आवश्यक सोयीसुविधा करणे बंधनकारक आहे.

१. ओला व सुका कचरा जागीच वेगळा करणे.

२. बंदीस्त स्वरुपाच्या वाहनातून ओला व सुका कचरा वेगळा वाहून नेणे.

३. डंपिंग ग्राउंडवर कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट नियमानुसार करणे.

४. भाडेतत्वावरील वाहने लावणे.

५. घंटागाडी सुरु करणे.

६. लिटर बिन्स मागवणे.

७. ओला व सुका कचरा वर्गीकरणासाठी जनजागरण करणे.

८. प्रभाग निहाय, नागरिकांच्या, नगरसेवकांच्या बैठका घेणे.

९. मा. महासभेत तज्ञांकडून माहिती देणे.

**सूचना :**

- बंदिस्त जलनि:सारण नाल्यांमध्ये ठराविक अंतरावर उघडझाप करता येण्याजोगी जाळी बसवावी. जेणेकरुन या नाल्यांमध्ये येणारा कचरा जाळीत अडकून त्याची सफाई करणे सुलभ होईल. त्याचप्रमाणे नाले ज्या ठिकाणी समुद्र, खाडी, नदीला मिळतात तेथे देखील अशा प्रकारची जाळी बसवावी. जेणेकरुन या नाल्यामधील घनकचरा समुद्र, खाडी नदीत मिसळला जाणार नाही. तसेच भरतीच्या दरम्यान येणाऱ्या पाण्यामधून येणारा घनकचरा या जाळीमुळे अडवला जाईल.

- ज्या ठिकाणी नाले रेल्वेच्या हद्दीतून जातात, अशा ठिकाणी नाल्याच्या साफसफाईमुळे उद्‍भवणाऱ्या समस्यांवर उपाय शोधून काढण्यासाठी व.वि.श.म.पा. रेल्वे प्रशासन व पर्यावरण संस्था यांची कमिटी स्थापन करण्यात यावी.

- निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर योग्य ती प्रक्रिया करुन ते सांडपाणी जलस्त्रोतात न सोडता ते वनीकरण, शेती व अन्य नागरी उपाययोजनांसाठी वापरण्यात यावे.

- महानगरपालिका हद्दीत सांडपाण्याची योग्य ती विल्हेवाट लावणे जरुरी आहे की जेणेकरुन रोगराई किंवा साथीच्या रोगास आळा बसेल.

- पिण्याच्या फुटलेल्या पाईप लाईन्सवर ताबडतोब दुरुस्ती करणे, जेणेकरुन पिण्याचे पाणी दूषित होणार नाही.

- महापालिकेने पाणीपुरवठा करण्यापूर्वी पाण्याचे क्लोरीनेशन, डोसिंग करणे आवश्यक आहे. व पाणीपुरवठा करणारी पाईप लाईन वेळोवेळी तपासणे गरजेचे आहे.

- सर्व नवीन इमारतींना एस.टी.पी. व रेनवॉटर हारवेस्टींग करणे बंधनकारक करतानाच प्रोत्साहन योजना राबविणे गरजेचे आहे.

- पाणीपुरवठा करण्यापूर्वी पाण्याचे परिक्षण सातत्याने करणे आवश्यक आहे.

- जुन्या जलवाहिन्या काढून टाकाव्यात तसेच पिण्याच्या पाण्याच्या टाक्या वेळोवेळी साफ करणे गरजेचे आहे.

- नदी नाले यांचे नकाशे लक्षात घेवून बांधकामास परवानगी द्यावी. त्यामुळे पुरास प्रतिबंध होईल.

- पावसाळयात नागरिकांना पाणी वापराबाबत प्रोत्साहीत करण्यासाठी व.वि.श.म.पा. ने वर्षातून रॅली, जाहीरात, बॅनर, पोस्टर इ. माध्यमाद्वारे नागरिकांना पाण्याचे महत्त्व पटवून द्यावे.

- व.वि.श.म.पा. क्षेत्रात असणाऱ्या तलावाची शास्त्रोक्त पध्दतीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन वेळोवेळी साफसफाई तथा शुध्दीकरण करुन, त्यांची निगा राखावी, जेणेकरुन नागरिकांना त्याचा लाभ घेता येईल व पर्यावरण संतुलनास हातभार लाभेल.

# ब) जल पर्यावरण

पाणी हा पर्यावरणाचा एक मुख्य घटक आहे. निसर्गतः पृथ्वीवर ७५% पाणी आहे. असे असले तरी प्रत्यक्षात पिण्याचे पाणी मात्र जेमतेम ½ टक्का एवढेच आहे. त्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने व काळजीपूर्वक करणे ही काळाची गरज आहे. पिण्याच्या पाण्याचे मुख्य स्त्रोत म्हणजे नदी, तलाव, विहीरी इ. आहेत. व. वि.श.म.पालिकेत हया पाण्यावर शुध्दीकरण प्रक्रिया करुनच ते पिण्यासाठी उपलब्ध केले जाते.

# पाणीपुरवठा योजना

**वाढीव १०० द.ल.ली. वसई - विरार पाणी पुरवठा योजना :**

सद्यस्थितीत पेल्हार, ऊसगांव व सुर्या पाणी पुरवठा योजनेतून एकूण १३० द.ल.ली. पैकी गळती वजा जाता प्रत्यक्ष ११० द.ल.ली. पैकी गळती वजा जाता प्रत्यक्ष ११० द.ल.ली. प्रतिदिन पाणीपुरवठा करण्यात येत असून यावरील योजना महानगरपालिकेच्या मालकीच्या असून योजनेवरील देखभाल व दुरुस्ती खर्च पाणीपट्टीच्या स्वरुपात थेट भोगवटादारांकडून महानगरपालिका वसूल करीत आहे.

"महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना" अंतर्गत शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजना प्रकल्पा अंतर्गत खालील कामांचा समावेश आहे

(सुर्या नदी मासवण बंधारा उद्भव)

१. सुर्या नदीवर १२५ मी. लांबीचा आर.सी.सी. बंधारा बांधणे.

२. मासवण बंधाऱ्याची दुरुस्ती

३. उद्भव विहीर

४. मासवण धरण ते जलशुद्धीकरण केंद्रापर्यंतची १५२४ मि.मी. व्यासाची ४.६ कि.मी. लांबीची अशुद्ध पाण्याची उर्ध्व वाहिनी.

५. अशुद्ध पाण्याची पंपींग यंत्रणा (एकूण क्षमता १०४० अश्वशक्ती)

६. १४० द.ल.लि. / प्रतिदिन क्षमतेची जलशुद्धीकरण केंद्रे

७. शुद्ध पाण्याची पंपींग यंत्रणा (एकूण क्षमता २२६० अश्वशक्ती)

८. जलशुद्धीकरण केंद्र ते काशिद - कोपर एम.बी.आर. पर्यंतची १५२४ मीमी व्यासाची २८ कि.मी. लांबीची शुद्ध पाण्याची उर्ध्व वाहिनी.

९. काशिद -कोपर एम.बी.आर. ते झोनल एम.बी. आर. पर्यंतची शुद्ध पाण्याची गुरुत्व वाहिनी (एकूण लांबी २४.२५ कि.मी.)

१०. किरकोळ कामे व स्काडासारखी स्वयंचलित यंत्रणा.

महानगरपालिका क्षेत्राचा झपाट्याने होणारा विकास व वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन भविष्यातील पाण्याची गरज भागविण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने महाराष्ट्र शासनाच्या "महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान २०१०" अंतर्गत रु. ३५० कोटी किंमतीची वाढीव १०० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा योजना राबविण्यास मा. सर्वसाधारण सभा दि. १५.०९.२०१२ ठराव क्र. १८ अन्वये मंजुरी दिली आहे. तसेच वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मालकीचे कायमस्वरुपी पाण्याचे स्त्रोत म्हणून १८० द.ल.लि. प्रतिदिन पाणी पुरवठा करणाऱ्या सुसरी धरणाचे काम जलसंपदा विभागामार्फतत पूर्ण ठेव तत्वावर प्रगतीपथावर असून त्यासाठी महानगरपालिकेने आजतागायत रु. १६.०० कोटी रक्कम वर्ग केली आहे.

## महानगरपालिका क्षेत्रातील तलावांची यादी

| अ.क्र. | विभाग | तलावाचे नांव | सद्य स्थिती |
|---|---|---|---|
| १ | विरार | १) नारिंगी | |
| | | २) डोंगरपाडा गांव | |
| | | ३) वर्तक वॉर्ड | |
| | | ४) टोटाळे | |
| | | ५) मनवेलपाडा | |
| | | ६) रानळे | |
| २ | नालासोपारा | ७) चक्रेश्वर | |
| | | ८) मोरेगांव | |
| | | ९) नागेला | |
| | | १०) आचोळे | |
| ३ | नवघर माणिकपूर | ११) चुळणे | |
| | | १२) खरगोडा | |
| | | १३) दिवाणमान | |
| | | १४) नाझरेथ | |
| | | १५) फादर बेनेडीक्ट | |
| | | १६) उमेळमान | |

| अ.क्र. | विभाग | तलावाचे नांव | सद्य स्थिती |
|---|---|---|---|
| ४ | वसई | १७) पापडी | |
| | | १८) बोंडआळी | |
| | | १९) तामतलाव | |
| ५ | आगाशी | २०) आगाशी | |
| ६ | वटार | २१) डॉन तलाव | |
| | | २२) भोंगाळे तलाव | |
| ७ | सत्पाळे | २३) सत्पाळे गांव तलाव | |
| | | २४) सांबाळे | |
| | | २५) सत्पाळे तलाव | |
| | | २६) कोफराड तलाव | |
| ८ | बोळींज | २७) बोळींज तलाव | |
| | | २८) मनकर्णीका देवी तलाव | |
| | | २९) करमाळे सोनेरी तलाव | |
| ९ | उमराळे | ३०) कृधावत तलाव | |
| | | ३१) उमराळे तलाव | |
| १० | नाळे | ३२) नाळे तलाव | |
| | | ३३) भंडाळे तलाव | |
| ११ | मर्देस | ३४) मर्देस तलाव | |
| १२ | नवाळे | ३५) नवाळे तलाव | |
| १३ | गास | ३६) अंबटबाव | |
| | | ३७) अंदाळा | |
| | | ३८) गास मोठे तलाव | |
| | | ३९) काळुंज | |
| | | ४०) शिरमोळी | |
| | | ४१) भटीला | |
| | | ४२) इंडीयानी गोलाई वरला तलाव | |

| अ.क्र. | विभाग | तलावाचे नांव | सद्य स्थिती |
|---|---|---|---|
| १४ | निर्मळ | ४३) विमल तलाव | |
| | | ४४) मलाई तलाव | |
| १५ | भुईगांव | ४५) भोला तलाव | |
| | | ४६) गोराई | |
| | | ४७) डोंगरी | |
| १६ | गिरीज | ४८) गिरीज तलाव | |
| १७ | कौलार (खु.) | ४९) मोठा तलाव | |
| १८ | कौलार (बु.) | ५०) रानगांव तलाव | |
| | | ५१) देवाळी तलाव | |
| १९ | सालोली | ५२) बरमाळा तलाव | |
| | | ५३) सालोली तलाव | |
| २० | सांडोर | ५४) रेळबा तलाव | |
| | | ५५) देव तलाव | |
| २१ | मुळगांव | ५६) मुळगांव तलाव | |
| २२ | किरवली | ५७) किरवली | |
| २३ | वडवली | ५८) वडवली तलाव | |
| २४ | उमेळा | ५९) उमेळा तलाव | |
| २५ | जुचंद्र | ६०) गोडा तलाव | |
| | | ६१) गांधी तलाव | |
| २६ | कामण | ६२) पिरांचा तलाव | |
| | | ६३) अंबे तलाव | |
| २७ | राजीवली | ६४) राजीवली गांव तलाव | |
| | | ६५) वगारपाडा वाणीचा तलाव | |
| | | ६६) वगारपाडा पिरांचा तलाव | |
| | | ६७) वगारपाडा सोनुचा तलाव | |

| अ.क्र. | विभाग | तलावाचे नांव | सद्य स्थिती |
|---|---|---|---|
| २८ | गोखिवरे | ६८) गोखिवरे तलाव | |
| २९ | वालीव | ६९) वालीव तलाव | |
| ३० | सातिवली | ७०) सातीवली तलाव | |
| ३१ | पेल्हार | ७१) कवाडीक तलाव | |
| ३२ | धानीव | ७२) धानिव गाव तलाव | |
| | | ७३) धानीवबाग तलाव | |
| ३३ | चंदनसार | ७४) घाणीचा तलाव | |
| | | ७५) कोपरी तलाव | |
| ३४ | शिरगांव | ७६) राणीपाडा तलाव | |
| | | ७७) शिरगांव गांव तलाव | |
| ३५ | कन्हेर | ७८) सामंतपाडा तलाव | |
| | | ७९) धारावी तलाव | |
| ३६ | मांडवी | ८०) मांडवी तलाव | |
| ३७ | कोशींबे | ८१) खार्डी तलाव | |
| | | ८२) कोशिंबे तलाव | |
| ३८ | दहिसर | ८३) दहिसर गाव तलाव | |
| | | ८४) दहिसर तलाव | |

# पाणी तपासणी (पावसाळयापुर्वी) : नळाचे

## सन २०१४ - २०१५

| Name of Location / Parameters | साई कॉलनी अचोळे | सोनाली शॉपींग सेंटर | त्रिम्बक बंगलो | साई कॉलनी, रॉक उद्याना जवळ | टपाल, कामगार वसाहत | घाटी अळी, सोपारा | पंप घर, दत्तनगर जवळ | अचोळे, विठ्ठल मंदिराजवळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| pH | ७.५५ | ७.३१ | ७.४६ | ७.४९ | ७.६१ | ७.३५ | ७.४० | ७.५७ |
| S.S | ७ | ९ | ६ | ५ | ९ | ५ | ४ | ७ |
| T.D.S. | १०१ | ११५ | १०८ | ११८ | १३० | १२४ | ११५ | १२३ |
| Hardness | ५८ | ५० | ५४ | ४९ | ५२ | ५० | ५३ | ५६ |
| Total Solids | १०८ | १२४ | ११४ | १२३ | १३९ | १२९ | ११९ | १३० |
| Alkalinity | ५० | ५४ | ५१ | ५५ | ५८ | ५३ | ५६ | ५३ |
| B.O.D. | १२ | १० | ८ | १० | १० | ५ | ७ | ११ |
| C.O.D. | २० | २४ | १६ | २० | १८ | २१ | २० | १८ |
| A.$N_2$ | ०.०४ | ०.०७ | ०.०९ | ०.०३ | ०.०५ | ०.०८ | ०.०६ | ०.०४ |
| $Cr^{+6}$ | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| Total $Po_4$- | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| Inorganic .$PO_{4-}$ | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| Cu | ०.०३ | ०.०६ | ०.०३ | ०.०२ | ०.०३ | Nil | ०.०६ | ०.०२ |
| Zn | ०.०७ | ०.०५ | ०.०५ | ०.०८ | ०.०९ | ०.०६ | ०.०९ | ०.०९ |
| Pb | ०.०४ | ०.०२ | ०.०३ | ०.०४ | ०.०२ | ०.०३ | ०.०५ | ०.०५ |
| Cd | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| MPN | <२ | <२ | ३ | <२ | ४ | ४ | <२ | ३ |
| E.coli | Absent | Absent | Absent | Absent | Absent | Absent | Absent | Absent |

**निरिक्षणे :**

पावसाळयापूर्वी नळाची पाणी तपासणी केली असता असे आढळून आले की, सर्वच ठिकाणी, भौतिक व रासायनिक घटक विहित मर्यादेच्या आत आहेत. सूक्ष्मजीव मात्र काही ठिकाणी अत्यल्प प्रमाणात तथापि विहित मर्यादेच्या आत आढळून आले.

# पाणी तपासणी (पावसाळयादरम्यान) : नळाचे

## सन २०१४-२०१५

| Name of Location / Parameters | साई कॉलनी अचोळे | सोनाली शॉपींग सेंटर | त्रिम्बक बंगलो | साई कॉलनी, रॉक उद्याना जवळ | टपाल, कामगार वसाहत | घाटी अळी, सोपारा | पंप घर, दत्तनगर जवळ | अचोळे, विठ्ठल मंदिराजवळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| pH | ७.१५ | ७१४ | ७.१९ | ७.३१ | ७.२५ | ७.२२ | ७.२३ | ७.३३ |
| S.S | १२ | १९ | १६ | १० | १२ | १० | १३ | १५ |
| T.D.S. | १३८ | १२९ | १३५ | १४२ | १३५ | १४१ | १३९ | १५० |
| Hardness | ६० | ६५ | ५९ | ६१ | ६४ | ६२ | ६५ | ६४ |
| Total Solids | १५० | १४८ | १५१ | १५२ | १४७ | १५१ | १५२ | १६५ |
| Alkalinity | ५९ | ६१ | ५९ | ६५ | ६४ | ६० | ५८ | ६३ |
| B.O.D. | २० | १६ | १२ | १८ | १६ | १४ | २० | १६ |
| C.O.D. | ६० | ४८ | ६४ | ५४ | ४० | ४८ | ६४ | ३० |
| $A.N_2$ | ०.१ | ०.०९ | ०.११ | ०.०८ | ०.०९ | ०.१ | ०.१ | ०.०७ |
| $Cr^{+6}$ | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| Total $Po_{4}$- | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| Inorganic .$PO_{4-}$ | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| Cu | ०.०३ | ०.०५ | ०.०५ | ०.०४ | ०.०४ | ०.०५ | ०.०३ | ०.०४ |
| Zn | ०.०२ | ०.१९ | ०.०९ | ०.१२ | ०.१ | ०.१४ | ०.११ | ०.१३ |
| Pb | ०.०३ | ०.०५ | ०.०३ | ०.०४ | ०.०६ | ०.०४ | ०.०६ | ०.०५ |
| Cd | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| MPN | ५ | ६ | ४ | ५ | २ | ३ | २ | ३ |
| E.coli | Absent | Absent | Absent | Absent | Absent | Absent | Absent | Absent |

**निरिक्षणे :**

तपासणीअंती असे आढळून आले की, सूक्ष्मजीवांचे प्रमाण पावसाळयापूर्वीच्या तपासणीच्या तुलनेत थोडे जास्त आढळून आले आहे. तथापि ते विहीत मर्यादेच्या आत आहेत.

# पाणी तपासणी (पावसाळयापूर्वी) : कुपनलिका

## सन २०१४-२०१५

| Name of Location | बुध्द पाडा | टेपाचा पाडा | कदेज | कोळीनाका | कोकुट पाडा | वीर पाडा | लपडे पाडा | अचोळे तलावा जवळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Parameters | | | | | | | | |
| pH | ७.७१ | ७.४५ | ७.३९ | ७.६५ | ७.३४ | ७.८५ | ७.५९ | ७.२१ |
| Odour | Odour less | Odour less | Odour less | Odourless | Odourless | Odourless | Odourless | Odourless |
| Colour | Colourless | Colourless | Colourless | Colourless | Colourless | Colourless | Colourless | Colourless |
| S.S | १० | ४ | ३ | ७ | ५ | २ | ६ | ७ |
| T.D.S. | २८० | ४३१ | ५२३ | ७१९ | ७७५ | ४४२ | ४९२ | ४३६ |
| Hardness | २२८ | २१५ | २४१ | ३२० | ३०० | २४६ | ३०१ | २२५ |
| Total Solids | २९० | ४३५ | ५२६ | ७२६ | ७८० | ४४४ | ४९८ | ४४३ |
| Alkalinity | ४९ | ३७ | ५० | ४२ | ६७ | २९ | ४० | ४९ |
| B.O.D. | १८ | १० | ५ | १३ | १० | ६ | ८ | १० |
| C.O.D. | ८० | ३२ | ३६ | ४५ | ६० | १८ | २४ | २८ |
| $A.N_2$ | ०.५९ | ०.२३ | ०.२१ | ०.२८ | ०.४८ | ०.४२ | ०.३९ | ०.३३ |
| $Cr^{+6}$ | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| Total $Po_4$- | ०.०३९ | ०.०१६ | ०.०३१ | ०.०३६ | ०.०५३ | ०.०२९ | ०.०३५ | ०.०५० |
| Inorganic .$PO_{4-}$ | ०.०३१ | ०.०१० | ०.०२४ | ०.०३० | ०.०४८ | ०.०२० | ०.०२९ | ०.०४२ |
| Cu | ०.०१८ | ०.०१ | ०.०२५ | ०.००८ | ०.०१३ | ०.०२५ | ०.००९ | ०.००५ |
| Zn | ०.०३४ | ०.०२५ | ०.०७८ | ०.०३१ | ०.०३५ | ०.०४२ | ०.०३४ | ०.०१६ |
| Pb | ०.०१५ | ०.०११ | ०.०१८ | ०.०१३ | | | | ०.०१५ |
| Cd | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| MPN | ३ | ६ | <२ | २ | ५ | <२ | ३ | ४ |
| E.coli | Absent | Absent | Absent | Absent | Present | Absent | Present | Absent |

**निरिक्षणे :**

१. तपासणीअंती असे आढळून आले की, pH चे मूल्य सर्व ठिकाणी न्यूट्रल आहे.

२. तरंगते कणांचे प्रमाण अत्यल्प आहे.

३. विद्राव्य घटक बऱ्याच ठिकाणी विहित मर्यादेच्या (५०० च्या) पेक्षा जास्त आढळून आले.

४. ई - कोली हा सूक्ष्मजीव लपडेपाडा येथील पाण्यात आढळून आला.

# पाणी तपासणी (पावसाळया दरम्यान) : कुपनलिका
## सन २०१४-२०१५

| Name of Location / Parameters | बुध्द पाडा | टेपाचा पाडा | कदेज | कोळीनाका | कोकुट पाडा | वीर पाडा | लपडे पाडा | अचोळे तलावाजवळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| pH | ७.१५ | ७.२० | ७.३१ | ७.०० | ७.७३ | ७.६२ | ७.२१ | ७.७९ |
| Odour | Odourless | Odourless | Odourless | Odourless | Odourless | Odourless | Odourless | Odourless |
| Colour | Colourless | Colourless | Colourless | Colourless | Colourless | Colourless | Colourless | Colourless |
| S.S | ७ | १० | ५ | ११ | १३ | ७ | १२ | १० |
| T.D.S. | २९१ | ४४९ | ६१० | ७५१ | ७८५ | ४२८ | ४९० | ४५५ |
| Hardness | २२० | २३१ | २६० | ३३६ | ३४१ | २६७ | ३३० | २३९ |
| Total Solids | २९८ | ४५९ | ६१५ | ७६२ | ७९८ | ४३५ | ५०२ | ४६५ |
| Alkalinity | ५७ | ६० | ५८ | ५१ | ८५ | ३६ | ४५ | ५८ |
| B.O.D. | २३ | १४ | १९ | २७ | २५ | १६ | ११ | २२ |
| C.O.D. | ७६ | ३८ | २७ | ६१ | ५० | ४२ | ३० | ४८ |
| $A.N_2$ | ०.७८ | ०.३१ | ०.३७ | ०.४५ | ०.६५ | ०.५९ | ०.४३ | ०.३२ |
| $Cr^{+6}$ | ०.००५ | ०.०१ | ०.०१२ | <०.००१ | ०.००८ | ०.००५ | ०.०२ | <०.००१ |
| Total $Po_{4-}$ | ०.०४९ | ०.०२५ | ०.०३८ | ०००४६ | ०.५० | ०.०३२ | ०.०४१ | ०.०६२ |
| Inorganic $.PO_{4-}$ | ०.२६ | ०.०१६ | ०.०२९ | ०.०३२ | ०.०२३ | ०.०१८ | ०.०२५ | ०.०३० |
| Cu | ०.०४० | ०.०२८ | ०.०४२ | ०.०१८ | ०.०२२ | ०.०३८ | ०.०२१ | ०.०१७ |
| Zn | ०.०५१ | ०.०४७ | ०.०७७ | ०.०४५ | ०.०२९ | ०.०७१ | ०.०५३ | ०.०२१ |
| Pb | ०.०१५ | ०.०१० | ०.०२४ | ०.०१३ | <०.०१ | ०.०१५ | ०.०२१ | ०.०३२ |
| Cd | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil | Nil |
| MPN | ८ | ५ | १२ | ५ | ९ | ७ | ५ | १० |
| E.coli | Present | Absent | Present | Absent | Present | Present | Present | Present |

**निरिक्षणे :**

१. pH चे मूल्य सर्वच ठिकाणी पावसाळयापूर्वी केलेल्या तपासणीपेक्षा वाढलेले आढळून आले.

२. ई - कोली हा सूक्ष्मजी सर्वच ठिकाणी आढळून आला.

३. एकंदरीतरित्या सर्वच ठिकाणचे पाणी जसेच्या तसे पिण्यायोग्य नाही तथापि ते उकळून पिण्याजोगे आहे.

# पाणी तपासणी (पावसाळयादरम्यान) : नाला

## सन २०१४-२०१५

| Parameters | pH | SS | TDS | Total Solids | Hardness | Alkalinity | BOD | COD |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Name of Location | - | mg/lit | mg/lit | mg/lit | mg/lit | mg/lit | mg/lit | mg/lit |
| तुंगारेश्वर | ७.२५ | २३६ | २८५९ | ३१२६ | २५६ | १६० | ८६ | २१२ |
| कालीका माता मंदिर, नाला | ७.१२ | २४६ | ३०४४ | ३२९० | २९० | १८५ | १२० | ३७० |
| एम.डी. नगर, नाला | ७.३७ | ३१५ | ३१०५ | ३४२० | २२७ | १७१ | १०१ | ३४२ |
| अचोले, नाला | ७.५१ | ४२१ | २७३१ | ३१५२ | २४८ | १३५ | १५८ | ५४८ |
| शास्त्रीनगर माणिकपूर, नाला | ७.०४ | २७७ | ३२१५ | ३४९२ | २१० | १६१ | ११२ | ३७५ |
| स्मशानभूमी नालासोपारा, नाला | ७.२१ | २५३ | २६०० | २८५३ | २२३ | १७० | १३६ | ३६३ |
| जयगणेश नगर, नाला | ७.१५ | २९१ | २८५३ | ३१४४ | २४० | १४१ | १७४ | ५२८ |
| निर्मलनगर नाला | ७.३८ | २८५ | २४५१ | २७५६ | १८५ | १३७ | १५१ | ५६० |
| लोणावती नाल्याजवळ | ७.०१ | २०७ | २७८९ | २९९६ | २०९ | १३१ | १२५ | ३५२ |
| साईबाबा मंदिरा जवळ | ७.१३ | १९३ | २३७५ | २५६८ | १५३ | १३७ | १३७ | ४८३ |
| फॉरेस्ट नाका, नाला | ७.२८ | ३१२ | २८६१ | ३१७३ | २८५ | १४८ | १६५ | २३८ |
| सिव्हीक सेंटर, नाला | ७.१६ | १५५ | ३०१२ | ३१६७ | २१६ | १२७ | ११६ | ३२० |
| लक्ष्मी छेडा नगर, नाला | ७.२० | ३७९ | ३२२० | ३५९९ | २७८ | १३४ | ७९ | ४४२ |
| मेन गटार, नालासोपारा (पू) | ७.०५ | २२२ | २७४१ | २९६३ | २३१ | १४१ | १३४ | ४९६ |
| गोपचर पाडया जवळील खुला नाला | ७.१३ | १९५ | २३५० | २५४५ | २७० | १५० | १४० | ३८५ |
| जिवदानी रोड जवळील खुला नाला | ७.१९ | ३३४ | २८०९ | ३१४३ | ३०५ | १६२ | १३२ | ५२४ |
| फुलपाडा, नाला | ७.३१ | ४५९ | २९५४ | ३४१३ | ३२१ | १७७ | १२७ | २८० |
| तारवाडी नाला | ७.०० | २८२ | २७६३ | ३०४५ | ३६८ | १४५ | १५५ | ४०० |
| वसई स्टेशन नाला | ७.१५ | ३९३ | ३४०५ | ३७९८ | ३१४ | १५७ | १७४ | ४५६ |
| नवघर नाला | ७.२० | ४०८ | २८९६ | ३३०४ | २५५ | १८० | १५२ | ४८८ |

# पाणी तपासणी (पावसाळयापूर्वी) नाला :

## सन २०१४-२०१५

| Parameters | pH | SS | TDS | Total Solids | Hardness | Alkalinity | BOD | COD |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Name of Location | - | mg/lit | mg/lit | mg/lit | mg/lit | mg/lit | mg/lit | mg/lit |
| तुंगारेश्वर | ७.८९ | २१२ | २५१२ | २७२४ | २२० | १५५ | ८८ | ३२१ |
| कालीका माता मंदिर, नाला | ७.६५ | १६५ | २७०१ | २८६६ | २०३ | १८१ | ११५ | ३७५ |
| एम.डी. नगर, नाला | ७.९५ | १७४ | २५९२ | २७६६ | १९६ | १५६ | ९२ | २८२ |
| अचोले, नाला | ७.६० | २२० | २९१८ | ३१३८ | २३५ | १४५ | १०७ | ३०० |
| शास्त्रीनगर माणिकपूर, नाला | ७.७५ | १५२ | २३७५ | २५२७ | १७८ | १७९ | ७८ | २५६ |
| स्मशानभूमी नालासोपारा, नाला | ७.४२ | १७७ | २७४९ | २६२६ | १६९ | १४२ | १०५ | ३४१ |
| जयगणेश नगर, नाला | ७.५१ | २४५ | २५०२ | २७४७ | २१० | १८० | १२७ | ३९६ |
| निर्मलनगर नाला | ७.६९ | २७१ | २८७१ | २१४२ | १७७ | १६६ | १०९ | २७० |
| लोणावती नाल्याजवळ | ७.२८ | १०५ | १७८५ | १८९० | १८० | १७५ | ९१ | २४५ |
| साईबाबा मंदिरा जवळ | ७.६४ | २१३ | १५६२ | १७७५ | २३३ | १८१ | ८५ | २३० |
| फॉरेस्ट नाका, नाला | ७.७१ | १६८ | २११३ | २२८१ | २६१ | २१८ | ११५ | ३१२ |
| सिव्हीक सेंटर, नाला | ७.४५ | ११० | १५४२ | १६५२ | २०३ | १८६ | ९७ | २६४ |
| लक्ष्मी छेडा नगर, नाला | ७.९२ | १७५ | २३३१ | २५०६ | २३५ | ३०३ | ८० | ३०४ |
| मेन गटार, नालासोपारा (पू) | ८.०५ | २९१ | ३१२३ | ३४१४ | १६८ | १४४ | ८४ | २२८ |
| गोपचर पाडया जवळील खुला नाला | ७.६८ | १८१ | १९८५ | २१६६ | १९० | १८३ | १०२ | ३२० |
| जिवदानी रोड जवळील खुला नाला | ७.७३ | २२७ | २४११ | २६३८ | २१७ | १७८ | ११० | २७५ |
| फुलपाडा, नाला | ७.९० | १७९ | १७७० | १९४९ | २२६ | २५० | ८८ | २०४ |
| तारवाडी नाला | ७.६५ | ११५ | २२३३ | २३४८ | २७१ | २४३ | १२५ | २६८ |
| वसई स्टेशन नाला | ७.४९ | २३१ | २९४२ | ३१७३ | २३४ | १८८ | १४६ | ३१० |
| नवघर नाला | ७.७० | १९४ | २५०९ | २७०३ | १९३ | १७१ | १२० | २८८ |

# क) वायू पर्यावरण

दिवसेंदिवस वाढणाऱ्या हवेतील प्रदुषणावर नियंत्रण आणण्यासाठी केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने Continuous Ambient Air Monitoring Station निरनिराळया राज्यातील अतिमहत्वाच्या शहरांच्या ठिकाणी उभारणे बंधनकारक केले आहे.

हवाप्रदूषण हे प्रामुख्याने वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण व शहरीकरण यामुळे होते. व.वि.श.म.पा. क्षेत्राची लोकसंख्या १२ लाखाहून अधिक असल्याने या क्षेत्रातील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

(वातावरणातील प्रदूषणाची पातळी तपासणीसाठी वायू प्रदूषण चाचणीच्या दृष्टीने खालील पाच प्रदूषकांच्या तपासणीसाठी हवेचे नमुने घेतले जातात.)
१. सल्फर डायऑक्साईड, २. नायट्रोजन डायऑक्साईड, ३. अमोनिया, ४. तरंगणारे धुलीकण.
५. श्वसनाद्वारे शरीरात जाणारे तरंगणारे अतिसुक्ष्म अदृश्य धुलिकण.

हवा प्रदुषण चाचणीसाठी व.वि.श.म.पा. ने ठरवून दिलेली ठिकाणे अशातऱ्हेने निवडली आहेत की जेणेकरुन संपूर्ण महापालिका क्षेत्राचा समावेश होईल. वाहतुकीमुळे निर्माण होणाऱ्या या प्रदूषणाची पातळी तपासण्यासाठी महत्वाचे चौक निवडले गेले आहेत.



# हवेची गुणवत्ता तपासणी

## सन २०१४-२०१५

| अ.क्र. | ठिकाणाचे नांव | $RSPM_{१०}$ | SPM | $SO_२$ | $NO_X$ |
|---|---|---|---|---|---|
| १ | वसई रेल्वे स्टेशन | ७१.५ | २६७.२ | ३२.० | २५.० |
| २ | नालासोपारा बस स्टँड | ७८.३ | २८५.० | ३६.१ | ३१.८ |
| ३ | विठ्ठल रुक्मीणी मंदीर, वालीव | ६१.९ | १८१.४ | २६.५ | २४.० |
| ४ | पेल्हार तहसिलदार ऑफीस | ६५.४ | १८५.१ | २७.१ | २२.६ |
| ५ | आमची शाळा जिल्हा परिषद | ६०.७ | १६८.५ | २५.८ | २१.८ |
| ६ | वटार व्हीलेज | ५८.० | १६५.९ | २३.९ | १९.५ |
| ७ | सातीवली एमआयडीसी | ६५.४ | १८२.३ | २७.० | २९.३ |
| ८ | गोखीवरे | ६०.१ | १७७.६ | २५.४ | २५.९ |
| ९ | बीएसएनएल ऑफीस जवळ | ६२.७ | १६९.१ | १२.७ | २०.६ |
| १० | एसबी इस्टेट जवळ, विरार | ६४.२ | १६५.४ | २६.२ | २९.१ |
| ११ | नालासोपारा रेल्वे स्टेशन | ७६.० | २५१.८ | ३०.५ | २८.० |
| १२ | वसई विरार म्युनिसीपल, विरार | ६८.६ | १७८.२ | २८.२ | २५.४ |
| १३ | हनुमान मंदिर, आगाशी | ५७.३ | १५९.५ | २५.८ | २१.० |
| १४ | ग्लोबल सिटी विरार | ५४.९ | १५५.० | २३.५ | २०.० |
| १५ | नवघर | ६९.० | २३३.४ | २९.४ | २३.७ |
| १६ | अचोळे | ७३.४ | २२१.७ | ३०.० | २५.१ |
| १७ | माणिकपूर | ६१.० | १६४.३ | २७.१ | २४.८ |
| १८ | राम टेंपल बोलींज | ५८.८ | १५७.१ | २५.७ | २०.३ |
| १९ | नालासोपारा रिजन | ६०.५ | १६०.३ | २४.९ | २२.० |

| अ.क्र. | ठिकाणाचे नांव | $RSPM_{१०}$ | SPM | $SO_२$ | $NO_X$ |
|---|---|---|---|---|---|
| २० | सोमयाल पाडा सोपारा | ५९.३ | १६०.५ | २३.० | २०.६ |
| २१ | गास व्हीलेज | ५३.७ | १५५.८ | २१.९ | १९.२ |
| २२ | आंबाडी पोलीस चौकी | ७१.१ | २७७.० | ३०.० | २७.४ |
| २३ | निर्मल व्हीलेज | ५८.७ | १६५.४ | २४.५ | २०.२ |
| २४ | अर्नाळा | ५५.० | १५१.६ | २३.७ | २०.५ |
| २५ | पद्मश्री भाऊसाहेब वर्तक विद्या संकुल | ५९.० | १७०.२ | २५.१ | २१.७ |
| २६ | विवा सुपर मार्केट | ६७.५ | १८२.९ | २८.८ | २२.८ |
| २७ | पेल्हार नगरपरिषदेजवळ | ६१.० | १६५.१ | २५.४ | २०.० |
| २८ | प्रॉफीट सेंटर, सातीवली | ६२.२ | १६४.७ | २९.५ | २४.१ |
| २९ | खर्डे हॉस्पीटल, बोलींज | ५९.६ | १४४.५ | २६.० | २१.७ |
| ३० | साई वहीलेज सेंटर सातीवली | ५०.४ | १६९.० | २७.१ | २५.० |
| ३१ | गडकरी नगर विरार | ५५.८ | १७६.० | २५.९ | २०.९ |
| ३२ | नवघर बस स्टँड | ७५.२ | २८१.६ | ३४.० | २८.५ |

**हवा तपासणीची निरीक्षणे :**

| वर्ष | २०१४-१५ | | २०१३-१४ | | २०१२-१३ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान |
| $RSPM_{10}$ | ६३ | ४५.४ | ७०.३ | ५३.१ | ७६.८ | ५६.४ |
| SPM | १८७.२ | ११२.३ | २३०.७ | १४४.२ | ४८२.४ | १८८.५ |
| $SO_2$ | २६.९ | १९ | ३०.८ | २३.१ | ४२ | २४.७ |
| $NO_X$ | २३.४ | १६.६ | ३०.० | २०.८ | ४७.५ | २६.७ |

- आर. एस. पी.एम. १० चे प्रमाण मर्यादीत आढळून आले.
- एस.पी.एम. चे प्रमाण वसई रेल्वे स्टेशन , नालासोपारा बस स्टँड, पेल्हार तलाठी ऑफीस, अचोळे या ठिकाणी मर्यादेपेक्षा जास्त आढळून आले आहे.

## हवा प्रदूषणाचे होणारे परिणाम :

कोणतीही प्रदूषके ही प्रामुख्याने हवा व पाणी या दोन माध्यमातून शहर व सभोवतालच्या परिसरात पसरत जातात.

सभोवतालच्या हवा गुणवत्तेच्या निरीक्षणाचा अभ्यास केला असता असे दिसून आले की एसओटू ($SO_2$), एनओएक्स ($NO_x$), एसपीएम (SPM), आरएसपीएम (RSPM), सीओ (CO) आणि हायड्रोकार्बन (HC) यांची पातळी खूपच जास्त आहे. हे अतिसुक्ष्म धुलीकण फुप्फुसामध्ये जावून फुप्फुसांचा कर्करोग होण्याचे प्रमाण वाढले आहे. तरुण तसेच वयोवृध्द माणसांना दम्याचा त्रास होण्याचे प्रमाणही वाढतच चालले आहे. तसेच याचा परिणाम झाडांवर, प्राणीमात्रावरही होतो. गरोदर स्त्रीयांवरही याचा परिणाम होतो.

अचानक वाढलेल्या भूक्षेत्र विकासामुळे, वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे, उर्जेच्या आणि वस्तूच्या मागणीमध्ये वाढ झाल्यामुळे प्रवासाच्या चांगल्या सोयीमुळे लोकसंख्येची वाढ वसई विरार या शहरामध्ये होवू लागली आहे. त्यामुळे ठिकठिकाणीचे प्रदूषण वाढले आहे.

## सुचना :

- व.वि.श.म.पा. परिक्षेत्रात सी.एन.जी. इंधनाचे अधिकाधिक स्टेशने प्राधान्याने उभारणे गरजेचे आहे.
- ट्रॅफिक पोलिसांनी वाहनांची तपासणी करुन पी.यु.सी. चाचणी संदर्भात कडक कारवाई करावी.
- व.वि.श.म.पा. क्षेत्रात असलेल्या सर्व महत्त्वाच्या रस्त्यावर डिजीटल सिग्नल यंत्रणा राबवावी.
- व.वि.श.म.पा. क्षेत्रातील वाढती लोकसंख्या, विकासाबरोबरच औद्योगिकीकरण तसेच क्षेत्राबाहेरील उद्योग व अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी होणारी वाहतुकीची कोंडी व याची नागरिकांना बसलेली प्रत्यक्ष झळ या व इतर अनेक कारणांनी वायू प्रदूषण चाचणी सतत घेणे व त्याचे विवरण प्रशासनाला वेळोवेळी मिळणे गरजेचे आहे. जेणेकरुन वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी योग्य ती कार्यवाही करता येईल. यासाठी व.वि.श.म.पा. क्षेत्रात स्वतंत्र ॲम्बीएन्ट एअर मॉनिटरींग स्टेशन उभारायला हवे.
- कारखान्यांची धुरांडी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या उंचीनुसारच असावीत.
- तुळस, बांबू, अशोक, वड इ. वृक्ष अधिकाधिक लावणे गरजेचे आहे.

- नागरिकांनी खाजगी वाहनांचा वापर आवश्यकता असेल तेव्हाच करावा व जास्तीत जास्त सार्वजनीक वाहन वापरावर भर द्यावा जेणेकरुन वर्दळीच्या ठिकाणी कोंडी होणार नाही. साहजिकच वायु प्रदूषण, नियंत्रणास मदतही होईल.
- दुचाकी व सायकलचा पर्याय सुचवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा बचाव व वायू प्रदूषणास आळा बसेल.
- दिवाळीत धूर सोडणाऱ्या फटाक्यांच्या विक्रीवर तसेच ध्वनीप्रदूषण करणाऱ्या फटाक्यांवर बंदी आणावी.

सदर वर्दळीच्या ठिकाणी वाहनांमुळे होणारी कोंडी व वाहनांच्या कोंडीमुळे होणारे वायुप्रदूषण मर्यादीत ठेवण्यासाठी दक्ष ट्रॅफीक यंत्रणा, वन वे, रात्रीच्या वेळेस प्रकाशमान दिवे, तसेच पारदर्शक पट्टे, गतीरोधक, सर्व्हीस रोड असणे आवश्यक आहे.

वाहनांची वाढती वाहतूक व कारखाने यामुळे ध्वनी प्रदूषणात वाढ होत आहे. १३० डीबीच्या वरील ध्वनी लहरी या मानवास त्रासदायक असतात. मोठा आवाज जास्त वेळ राहिल्यास कायमचा बहिरेपणा येण्याची शक्यता असते.

# (ड) ध्वनी प्रदूषण

वातावरणावर काय परिणाम होईल याची तमा न बाळगता अनावश्यक आवाज निर्मिती म्हणजे ध्वनीप्रदुषण. ही आधुनिक जीवन शैलीने दिलेली देणगी आहे. गजबजलेली शहरे, स्वयंचलित वाहनांची वर्दळ, करमणुकीची नवनवीन साधने इ. ध्वनी प्रदूषणास हातभार लावीत आहेत.

कर्णकर्कश हॉर्न, किंचाळणारे ध्वनिक्षेपक, धर्मस्थळावरील ध्वनिक्षेपकावरुन सतत चाललेला मारा, लग्न, मुंजी व जनमोत्सवानिमित्ताने चाललेला जल्लोष, दिवस रात्र धडधडणारी यंत्रे, रस्ते भरभरुन पळणारी वाहने हा सध्याच्या जीवन शैलीचा एक अविभाज्य भाग झाला आहे. आणि या ध्वनिप्रदूषणातून वातावरण, जलसंपत्ती व भूप्रदेशाच्या गुणात्मकतेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर समस्या आहे. वाढती औद्योगिकता तंत्रज्ञान आणि यंत्रसामुग्री समाजजीवनात आधुनिकता आणत असली तरी यांचा ध्वनीप्रदुषणास मोठा हातभार लागत आहे. दिवसेंदिवस ध्वनि प्रदूषणात वाढ होत आहे.

## ध्वनी प्रदूषणाची उत्पत्ती

**नैसर्गिक : विजेचा कडकडाट**

**मानवनिर्मित :**

अ. औद्योगिक ध्वनी प्रदूषण, ब. वाहतूकजन्य ध्वनीप्रदूषण, क. परिसर ध्वनिप्रदूषण, टीव्ही, व्हिसीआर, रेडियो, ट्रॉन्झिस्टर, टेलिफोन इ. घरगुती साधनांमुळे होणारे ध्वनी प्रदूषण.

## ध्वनीप्रदूषणाची तीव्रता खालील गोष्टींवर अवलंबून असते.

- ध्वनी लहरींची वारंवारता
- ध्वनी लहरींची तीव्रता
- ध्वनी लहरींचे सान्निध्य
- ध्वनी लहरींची असलगता

## ध्वनी प्रदूषणाचा सर्वसाधारण जनतेवर होणारे परिणाम :

- मानसिक परिणाम
- श्रवण क्षमतेवरील परिणाम

शारिरीक विकार उदा. बहिरेपणा, वाढलेला रक्तदाब, चिडचिडेपणा, हृदयाची धडधड वाढणे, थकवा इ.

वने व पर्यावरण (MoEF) विभागातर्फे ध्वनीप्रदूषणासंबंधी, विविध जागेसाठी आणि विविध वेळांसाठी आवाजाच्या किमान मर्यादा निर्देशित केल्या आहेत. या मर्यादा खालीलप्रमाणे -

**ध्वनी प्रदूषणाच्या मर्यादा :**

| अ.क्र. | ठिकाणाचे स्वरुप | कमाल मर्यादा दिवसा (डेसिबल) | कमाल मर्यादा रात्री (डेसिबल) |
|---|---|---|---|
| १. | औद्योगिक केंद्र | ७५ | ७० |
| २. | व्यापारी केंद्र | ६५ | ५५ |
| ३. | रहिवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| ४. | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

दिवस : सकाळी ६.०० ते रात्री १०.००

रात्री : रात्री १०.०० ते सकाळी ६.००

शांतता क्षेत्र : शांतता क्षेत्र हा हॉस्पिटल, शैक्षणिक संस्था आणि न्यायालय यांसारख्या संस्थांना सभोवतालच्या जवळपास १०० मी. पर्यंतचा परिसर.

**ध्वनी मोजमाप पध्दती**

ध्वनीचं मोजमाप ध्वनीमापकाने केले जाते. यंत्राच्या वरील भागास असलेले Noise Sensor ध्वनी लहरींची तीव्रता यंत्रावरील छोटयाश्या दर्शकावर दाखवते.हे यंत्र दोन सेल वर चालते व ते लहान वहीच्या आकारा एवढे असते त्यामुळे ते सहजरीत्या कुठेही नेणे शक्य असते.



# ध्वनी सर्व्हे   २०१४-२०१५

| ठिकाणाचे नांव | ठिकाण | ध्वनी प्रदुषणाचे सर्वे डेसिबलमध्ये | |
|---|---|---|---|
| | | ध्वनी सर्वे (दिवस) | ध्वनी सर्व्हे (रात्र) |
| ठिकाण १ | वसई रेल्वे स्थानकाजवळ | ७७.८ | ६५.७ |
| ठिकाण २ | गोखिवरे | ६०.५ | ५७.९ |
| ठिकाण ३ | वाळीव | ६२.२ | ५४.२ |
| ठिकाण ४ | सातिवली | ६५.० | ५२.५ |
| ठिकाण ५ | नवघर | ६९.० | ६०.० |
| ठिकाण ६ | माणिकपूर | ५६.० | ५२.० |
| ठिकाण ७ | विरार रेल्वे स्थानक | ७८.२ | ७०.४ |
| ठिकाण ८ | औद्योगिक क्षेत्राजवळ, गोपचरपाडा, विरार | ६९.६ | ५६.७ |
| ठिकाण ९ | पराग अपार्टमेंटजवळ, गोपचरपाडाजवळ, विरार | ६३.३ | ५४.९ |
| ठिकाण १० | महात्मा फुले बाजारपेठ | ७०.९ | ५९.५ |
| ठिकाण ११ | बालाजी हॉस्पिटलजवळ, राम मंदिर | ६०.२ | ५५.८ |
| ठिकाण १२ | नालासोपारा रेल्वे स्थानक (पू.) | ७९.१ | ६८.० |
| ठिकाण १३ | अचोळे तलाव, विठ्ठलमंदिरजवळ, नालासोपारा (पू.) | ७१.४ | ५४.६ |
| ठिकाण १४ | वसंतनगर, जयविजय इमारतीजवळ, नालासोपारा (पू.) | ६८.० | ५८.१ |
| ठिकाण १५ | सिताराम भवन, नालासोपारा (पू.) | ६५.० | ५५.९ |
| ठिकाण १६ | सोपारा उद्यान | ६..७ | ५०.० |
| ठिकाण १७ | महेश उद्यान | ६०.१ | ५२.८ |
| ठिकाण १८ | सोपारा केंद्र | ७२.३ | ६४.५ |
| ठिकाण १९ | लक्ष्मछेडा नगर | ६७.८ | ५०.१ |
| ठिकाण २० | नवघर-माणिकपूर एस.टी.डेपो. | ६९.६ | ५७.६ |
| ठिकाण २१ | महात्मा फुले बाजारपेठजवळ, विरार | ७१.२ | ५२.४ |
| ठिकाण २२ | नालासोपारा एस.टी. डेपो जवळ | ७१.७ | ६७.१ |
| ठिकाण २३ | डंपिंग ग्राऊंडजवळ विरार (प.) | ५७.० | ५१.५ |
| ठिकाण २४ | डॉ. आंबेडकरनगर, जिवदानी पाडा | ६५.१ | ५६.३ |
| ठिकाण २५ | सिवीक सेंटर जवळ (व्यावसायीक क्षेत्र) | ७५.८ | ६७.० |
| ठिकाण २६ | भुरान चौक, (रहिवासी क्षेत्र) | ६१.९ | ५५.९ |
| ठिकाण २७ | टोपाझ केंद्र | ७०.४ | ६४.३ |
| ठिकाण २८ | राधाकृष्ण मंदिराजवळ, डोंगरपाडा | ६२.५ | ५१.९ |
| ठिकाण २९ | जनताबाजार जवळ, विराटनगर | ६९.१ | ५५.६ |
| ठिकाण ३० | वसई विरार म्युनिसिपल कॉर्पोरेशन | ६५.६ | ५५.८ |
| ठिकाण ३१ | राम मंदिर डोंगरपाडा, वर्तक रोड, विरार (प) | ५९.८ | ५०.३ |

**मागील तीन वर्षातील ध्वनी तपासणी :**

| वर्ष | २०१४-१५ | | | | २०१३-१४ | | | | २०१२-१३ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दिवस | | रात्र | | दिवस | | रात्र | | दिवस | | रात्र | |
| | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान |
| | ७९.१ | ५६.७ | ६८ | ५०.३ | ८५.७ | ६५.१ | ६६.९ | ४३.९ | ८२.९ | ६४.९ | ७० | ५०.४ |

**निरीक्षण :**

मागील तीन वर्षाचा ध्वनी तपासणीचा अहवाल बघता २०१४-१५ मध्ये ध्वनीची पातळी मागील वर्षापेक्षा कमी आढळून आलेली आहे.

## वसई विरार शहर महानगरपालिकेने घोषित केलेले शांतता क्षेत्र खालीलप्रमाणे -

# शांतता क्षेत्र घोषित केलेले ठिकाण

| अ.क्र. | शांतता क्षेत्र घोषित केलेले ठिकाण |
|---|---|
| १ | विवा कॉलेज, विरार (पश्चिम) |
| २ | अ.ब. स्मारक विद्यामंदिर - विरार (पूर्व) |
| ३ | वासंतीबाई विष्णू ठाकूर ट्रस्ट विद्यालय - विरार (पूर्व) |
| ४ | नॅशनल इंग्लिश हायस्कूल-कारिगल नगर, विरार (पूर्व) |
| ५ | जि.प. मराठी शाळा, फुलपाडा, रोड, गांधी चौक, विरार (पूर्व) |
| ६ | जि.प. शाळा बेघर्स होम चंदनसार रोड, विरार (पूर्व) |
| ७ | सेंट झेवियर इंग्लिश हायस्कूल-तिरुपती नगर, बोळींज, विरार (पश्चिम) |
| ८ | महावीर हॉस्पिटल- एम.बी.इस्टेट, विरार (पश्चिम) |
| ९ | सहयोग हॉस्पिटल-आगाशी रोड, विरार (पूर्व) |
| १० | जि.प. शाळा निळेगांव, नालासोपारा (पश्चिम) |
| ११ | जि.प. शाळा फॉरेस्ट नाका, तुळींज, नालासोपारा (पूर्व) |
| १२ | चंद्रेश लोढा मेमोरियल इंग्लिश हायस्कूल-वामी विवेकानंद नगर, नालासोपारा (पूर्व) |
| १३ | सेंट स्टॅनिसलॉस इंग्लिश हायस्कूल-आचोळा डोंगरी, नालासोपारा (पूर्व) |
| १४ | निर्मलमाता सेंट कानोसा गर्ल्स हायस्कूल माणिकपूर |
| १५ | सेंट झेवियर हायस्कूल, माणिकपूर चर्च |
| १६ | सेंट फ्रान्सिस इंग्लिश हायस्कूल, मुक्तीधामनगर, माणिकपूर |
| १७ | कल्पना लाईफलाईन हॉस्पिटल-दिवाणमान, नवघर (पश्चिम) |
| १८ | श्रेयस हॉस्पिटल-साईनगर, नवघर (पश्चिम) |
| १९ | सेंट पीटर इंग्लिश हायस्कूल-पद्मण नगर, नवघर (पश्चिम) |
| २० | संत फिलोमिना मराठी शाळा-सेंट मायकेल चर्च, नवघर (पश्चिम) |
| २१ | जि.प. शाळा उमेळमान, नायगाव (पश्चिम) |
| २२ | वसई न्यायालय - वसई (पश्चिम) |
| २३ | डिसोझा हॉस्पिटल - रमेदी, वसई (पश्चिम) |
| २४ | टी.बी. कॉलेज, पापडी चर्च, वसई (पश्चिम) |
| २५ | एम.जी. परुळेकर विद्यालय, वसई (पश्चिम) |

**सूचना :**

पालिका क्षेत्रातील शाळा, कॉलेज हॉस्पिटल अशा ठिकाणी नो हॉर्नचे बोर्ड लावणे तसेच काही खाजगी ठिकाणी फेरीवाला मनाई क्षेत्र असे बोर्ड लावावेत. तसेच नियमांचे उल्लंघन झाल्यास सक्त कारवाई करावी.

The Noise Pollution (Regulation & Control) Rules २००० नियमानुसार नवीन बांधकाम करतांना आवश्यक त्या यंत्रसामुग्रीची वेळोवेळी तपासणी करावी. जेणेकरुन त्यामुळे होणारा आवाज आटोक्यात राहील. उत्सवात, लग्नकार्यात बँड पासून होणाऱ्या आवाजावर तसेच कोणत्याही स्पीकारच्या आवाजावर मर्यादा असावी. अन्यथा कडक कारवाई करावी.

N.A.A.Q.M. ने ठरवून दिलेल्या ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या संस्था, व्यक्ती यांच्यावर कडक कारवाई करावी.

रहिवाशी क्षेत्र त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्र या ठिकाणी वेळोवेळी व.वि.श.म.पा. तर्फे ध्वनी प्रदूषणाची चाचणी करुन घेण्यास बंधनकारक करावे.

व.वि.श.म.पा. क्षेत्रातील वाढती लोकसंख्या, विकासाबरोबरच औद्योगिकरण तसेच, क्षेत्राबाहेरील उद्योग व अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी होणारी वाहतुकीची कोंडी व याची नागरिकांना बसलेली प्रत्यक्ष झळ, या व इतर अनेक कारणांनी वायू प्रदूषण चाचणी सतत घेणे व त्याचे विवरण प्रशासनाला वेळोवेळी मिळणे गरजेचे आहे. जेणेकरुन, वायू प्रदूषणाला आळा घालण्यासाठी योग्य ती कार्यवाही करता येईल. यासाठी व.वि.श.म.पा. क्षेत्रात, स्वतंत्र ॲम्बीएन्ट एअर मॉनिटरींग स्टेशन उभारायला हवे व यासाठी म.प्र.नि.मं. यांनी पुढाकार घेऊन व.वि.श.म.पा. चे माध्यमातून, कसोशीने प्रयत्न करायला हवेत.

## ✣ भाग ४ ✣

# अ) प्रदूषण नियंत्रण संस्था आणि त्याबाबतचे कायदे

**केंद्रशासन स्तरावरील संस्था**

1. **Ministry of Environment & Forest (MoEF)**

**ADDRESS** : INDIA PARYAVARAN BHAVAN
JOR BAGH ROAD, NEW DELHI- 110 003.
INDIA ✆ PHONE: 011-24362064

पर्यावरण संतुलन तथा प्रदूषण नियंत्रणासंबंधीच्या निरनिराळया योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार, (MoEF) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (CPCB) NAAQM तसेच राज्यपातळीवर पर्यावरण मंत्रालय, राज्य सरकार, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यरत असून, स्थानिक पातळीवर महानगरपालिका देखील सतर्क आहे

**ब) पर्यावरण संतुलन तथा प्रदूषण नियंत्रणासंबंधी निगडीत कायदेशीर तरतूदींची अंमलबजावणी खालीलप्रमाणे -**

१. प्रकरण १२ - नाला, जलनि:सारण व मल:निसारणाची विल्हेवाट लावणे संबंधीची कामे.

२. प्रकरण १३- पाणीपुरवठा-महापालिकेने जलव्यवस्था केंद्र बांधणे व ती सुस्थितीत राखणे.

३. प्रकरण १४- रस्ते-बांधणे सुस्थितीत राखणे व सुधारणे.

४. प्रकरण १५- स्वच्छता विषयक तरतुदी

५. प्रकरण १६- बाजार व कत्तलखाने

६. प्रकरण १७-परिवहन उपक्रम चालवणे.

**१. महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसूचि ड मधील तरतूदी**

प्रकरण ९- जलनि:सारण आणि मल:निसारणाची कामे.

प्रकरण १०- पाणीपुरवठा

प्रकरण ११- रस्ते

प्रकरण १३- अग्निशमन पथक

प्रकरण १४- स्वच्छता विषयक तरतुदी

प्रकरण १५- बाजार आणि कत्तलखाने

२. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ (M.R.T.P. १९६६) तरतुदीनुसार नवीन बांधकामांना परवानगी देतांना पर्यावरण विषयक तरतुदीचे पालन उदा. झाडे लावणे, सांडपाण्याची विल्हेवाट योग्य रितीने लावणे. रेन वॉटर हार्वेस्टींग सक्तीचे करणे इत्यादी बाबतचे कामकाज व.वि.श.म.पा. च्या नगररचना विभागाकडून करण्यात येते.

३. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे जतन अधिनियम १९७५ मधील तरतुदीनुसार व.वि.श.म.पा. क्षेत्रात वृक्ष प्राधिकरणाची स्थापना तसेच वृक्ष अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली असून, नवीन झाडे लावणे, उद्याने विकसीत करणे व त्यांचे जतन करणे तसेच झाडे तोडण्यास निर्बंध करणे इत्यादीची अंमलबजावणी नियमानुसार करण्यात येते.

४. महाराष्ट्र प्लॅस्टिक कॅरीबॅग (Manufactures & Users) नियम २००६ मधील तरतुदीनुसार व.वि.श.म.पा. क्षेत्रात ५० मायक्रोनपेक्षा कमी जाडीच्या पिशव्यांना निर्बंध घालण्यात आले असून, प्लॅस्टिक पिशव्यांचा साठा करण्यावर दंडात्मक कारवाई, घनकचरा विभागामार्फत करण्यात येत आहे. सदरची कारवाई सतत सुरू राहणार आहे. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ हा मूळ कायदा व तदअनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन, जैववैद्यकीय कचरा विल्हेवाट, वायू, ध्वनी, जल प्रदूषण अशा अत्यावश्यक बाबींकरीता प्रदूषण हाताळणी करीता केंद्र शासनाच्या पातळीवर सेंट्रल पोल्यूशन कंट्रोल बोर्ड व राज्यशासनाच्या पातळीवर महाराष्ट्र पोल्यूशन कंट्रोल बोर्ड यांच्या माध्यमातून अस्तित्वात आलेल्या नियमांचे अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवण्यात येते. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

1. Environment (Protection) Act 1986
2. The Air (Prevention & Control of pollution) Act 1981
3. The Municipal Solid Waste (Management & Handling) Rules 1989
4. Hazardous Waste (Management & Handling) Rules 1989
5. The Water (Prevention & Control of pollution) Act 1974
6. The Noise Pollution (Regulation & Control) Rules 2000

पर्यावरण विषयक उपरोक्त कायदे व नियम यांचे अंमलबजावणी कामी व.वि.श.म.पा. क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक कार्यालय, प्रादेशिक अधिकारी, यांच्या अधिपत्याखाली कार्यरत आहेत.

**पर्यावरणपूरक विकास व नियमावली :**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना आराखडा २०१३ मध्ये शहर विकास नियमावली तयार केली आहे. सदर विकास नियमावलीमध्ये अनेक पर्यावरणपूरक तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्यातील काही उल्लेखनीय नियम खालीलप्रमाणे आहेत.

**औद्योगिक क्षेत्र :**

महाराष्ट्र शासनाच्या औद्योगिक स्थान निश्चयत धोरणानुसार उद्योगांना परवानगी देण्यात येईल. प्रदूषणकारी, धोकादायक रासायनिक उद्योगांना परवानगी देण्यात येणार नाही.

समुद्रतटीय क्षेत्रातील विकासाचे नियमन केंद्र शासनाच्या १९९१ आणि २०११ च्या अधिनियमानुसार करण्यात येईल.

गुरांच्या गोठयांच्या उभारणीसाठी स्वतंत्रपणे नियमावली करण्यात आली असून १० व त्यापेक्षा जास्त गुरांच्या गोठयासाठी २००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राचा भूखंड आवश्यक असून त्यातील ५० टक्के क्षेत्र चरावू क्षेत्र असणे आवश्यक आहे.

रहिवासी व व्यापारी संकुलनासाठी खालीलप्रमाणे रिक्रीएशन जागा बाग राखणे आवश्यक आहे.

| भूखंडाचे क्षेत्र | आर.जी. क्षेत्र |
|---|---|
| १००० ते ४००० चौ.मी. | १० टक्के |
| ४००१ ते १०००० चौ.मी. | १५ टक्के |
| १०००१ ते अधिक | २० टक्के |

भूखंडातील जी झाडे विकास कामासाठी तोडावी लागतील त्याच्या दुप्पट झाडे लावणे बंधनकारक असेल. तसेच बांधकाम क्षेत्रासाठी ३० चौ.मी. ला १ व आर.जी. क्षेत्रासाठी १० चौ.मी. ला १ झाड लावणे आवश्यक आहे.

## ✣ भाग - ५ ✣

# वैद्यकीय आरोग्य विभाग व शैक्षणिक सुविधा

वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जुलै २००९ रोजी झाली असून महानगरपालिकेने वैद्यकीय आरोग्य विभाग दिनांक १४ जुन २०११ रोजी स्थापन करण्यात आला आहे. वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत महानगरपालिका क्षेत्रात १ रुग्णालय, ९ नागरी आरोग्य केंद्रे व ९ दवाखाने यांचे कामकाज पाहिले जाते.

### रुग्णालय :

महानगरपालिकेचे वसई येथे सर डी.एम.पेटीट हे एकमेव ६४ खाटाचे रुग्णालय कार्यरत आहे. सदर रुग्णालयात बाहय रुग्ण विभाग, आंतर रुग्ण विभाग, प्रसुति कक्ष, शस्त्रक्रिया, बालरोग, स्त्रीरोग, एक्सरे, सोनोग्राफी व पॅथॉलॉजी इ. विभाग असून रुग्णांना अल्प दरात सेवा पुरविली जाते.

सद्यस्थितीत रुग्णालयात २ एम.बी.बी.एस व ८ बी.ए.एम.एस. अर्हता धारण करणारे वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. रुग्णालयात स्त्रीरोग तज्ञ, बालरोग तज्ञ, फिजिशियन, सर्जन, अस्थिरोग तज्ञ, रेडियोलॉजिस्ट यांची मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेने रुग्णालयास लागणारी औषध खरेदीची निविदा मंजूर करण्यात आलेली असून या मंजूर निविदेमधून आवश्यक औषधांचा पुरवठा करण्यात येतो. मंजूर निविदा यादीत समाविष्ट नसलेल्या औषधांची खरेदी रुग्णांना बाहेरुन करावी लागते.

**सदर रुग्णालयात तयार होणारा जैविक कचरा एनव्हायरो व्हिजील या संस्थेमार्फत गोळा करुन त्यांची विल्हेवाट लावली जाते.**

### नागरी आरोग्य केंद्र :

शासनाने महानगरपालिका कार्यक्षेत्राकरीता ९ नागरी आरोग्य केंद्रे मंजूर करण्यात आली असून त्यापैकी ८ नागरी केंद्रे कार्यरत आहेत. नालासोपारा प. येथील नागरी आरोग्य केंद्र लवकरच पूर्णतः कार्यरत होत आहे.

प्रत्येक नागरी आरोग्य केंद्रासाठी १ वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) १ पी.एच.एन / एल.एच.व्ही., १ कनिष्ठ लिपीक तथा संगणक चालक, १ शिपाई असा कर्मचारी वर्ग मंजूर करण्यात आला आहे.

व.वि.श.म.ने डासांवर आळा बसविण्यासाठी काही खास उपाययोजना केल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे -

१. आठवडयातून एकदा ठिकठिकाणी डासांवर प्रतिबंध म्हणून फवारणी करण्यात येते.

२. किटाणूनाशक फवारणी करण्यात येते.

३. सर्व ठिकाणी तयार होणाऱ्या जैविक कचरा गोळा करुन सदर कचऱ्याचे प्लांट मधून विल्हेवाट लावली जाते. तसेच सार्वजनिक जागरुकता मोहीम राबवली जाते.

सद्यस्थितीत १ वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) ३ पी.एच.एन/एल.एच.व्ही., ३ कनिष्ठ लिपीक तथा संगणक चालक, ३ शिपाई यांची कंत्राटी तत्वावर नेमणूक आर.सी.एच. उपक्रमांतर्गत करण्यात आली आहे. सदर नागरी आरोग्य केंद्राकरीता जैविक कचरा 'एनव्हायरो व्हिजिल' या संस्थेमार्फत गोळा करुन त्यांची विल्हेवाट लावली जाते.

सदर नागरी आरोग्य केंद्रासाठी लागणारी औषधे ही मागणीनुसार महानगरपालिकेच्या मंजूर निविदाधारकांकडून पुरवठा केला जातो. आर.सी.एच. उपक्रमांतर्गत उपलब्ध निधीतून औषधे, ही मंजूर निविदाधारकांकडून मागणीनुसार पुरविली जातात.

**या नुसार महानगरपालिकेची नागरी आरोग्य केंद्रे खालील ठिकाणी कार्यरत आहेत.**

नागरी आरोग्य केंद्र पी.पी.रोड, विराट नगर, विरार (प.)

- नागरी आरोग्य केंद्र साईदत्ता झोपडपट्टी, चंदनसार रोड, विरार (प.)
- नागरी आरोग्य केंद्र आंबेडकर नगर, टाकी रोड, तुळींज, नालासोपारा (पूर्व)
- नागरी आरोग्य केंद्र धानीव, नालासोपारा हायवे रोड, नालासोपारा (पूर्व)
- नागरी आरोग्य केंद्र आचोळे महानगरपालिका बहुउद्देशीय इमारत, वालीव, नवीन ग्रामपंचायत इमारत, वसई रोड (पूर्व)
- नागरी आरोग्य केंद्र, वालीव, महानगरपालिका बहुउद्देशसीय इमारत, वालीव, नवीन ग्रामपंचायत इमारत, वसई रोड (पूर्व)
- नागरी आरोग्य केंद्र, दिवाणमान, महानगरपालिका बहुउद्देशसीय इमारत, दिवाणमान तलाव, वसई रोड (पूर्व)
- नागरी आरोग्य केंद्र, वसई गाव, वसई रोड (प.)

नागरी आरोग्य केंद्रामधून नियमित लसीकरण, कुटूंब कल्याण कार्यक्रमात बाहय रुग्ण विभाग, स्त्रीरोग तज्ञांची तसेच बालरोग तज्ञांची आठवडयाला एक एक भेट तसेच श्वानदंश लस देणे हे उपक्रम राबविले जातात. गरोदर स्त्रियांची लवकरात लवकर नोंदणी व तपासणी नागरी आरोग्य केंद्राच्या ए.एन.एम. मार्फत केली जाते. त्यांना आवश्यकतेनुसार रक्तवर्धक गोळया व धनुर्वात लसी दिल्या जातात. किशोरवयीन मुलामुलींसाठी समुपदेशन केंद्र वसई येथील रुग्णालयात सुरु करण्यात आले आहे.

नागरी आरोग्य केंद्राच्या लिंकवर्कर्सच्या माध्यमातून समाजातील तळागाळातील लाभार्थ्यांमार्फत आरोग्य सेवा पोहचविण्याचा प्रयत्न केला जातो. त्यांचे मार्फत तसेच महिला आरोग्य समितीमार्फत जनसामान्यांमध्ये आरोग्यविषयक तसेच साथ रोग, कुटूंब कल्याण नियमित लसीकरण यांचे विषयी जनजागरण करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच त्यांच्या माध्यमातून गरोदर स्त्रियांना लवकरात लवकर आरोग्य सेवा पुरविल्या जातात व जननी सुरक्षा योजनेचा लाभ पात्र लाभार्थीना दिला जातो.

शासनाकडून प्राप्त आदेशानुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रात जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे जननी सुरक्षा कार्यक्रम राबविणेकरीता मंजुरीसाठी महासभेपुढे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.

**महानगरपालिका दवाखाने :**

महानगरपालिका कार्यक्षेत्रात ९ दवाखाने कार्यरत आहेत. सदर दवाखान्यांमध्ये केवळ बाहय रुग्ण विभागांमार्फत रुग्णांना सेवा पुरविली जाते. सदर दवाखान्यांमध्ये महानगरपालिकेने ठेका पद्धतीने पुरविण्यात आलेले १ बी.ए.एम.एस. अर्हताधारक वैद्यकीय अधिकारी व १ खाजगी प्रशिक्षित परिचारिका कार्यरत आहेत.

**महानगरपालिका क्षेत्रात खालील ठिकाणी महानगरपालिकेचे दवाखाने कार्यरत आहेत.**

- जिजाईनगर, मोरेगाव, दवाखाना/ आरोग्य केंद्र, नालासोपारा (पूर्व)
- बिलाल पाडा, दवाखाना/आरोग्य केंद्र, नालासोपारा (पूर्व)
- सातिवली, दवाखाना/आरोग्य केंद्र, वसई रोड (पूर्व)
- वसई इंडस्ट्रियल असोसिएशन दवाखाना / आरोग्य केंद्र, नवघर (पूर्व)
- ओमकार दवाखाना / आरोग्य केंद्र, वसई (प.)
- जि.प. शाळेजवळ दवाखाना /आरोग्य केंद्र, माणिकपूर, वसई रोड (प.)

- बऱ्हामपूर, दवाखाना / आरोग्य केंद्र, बऱ्हामपूर, वसई रोड (प.)
- नवघर दवाखाना / आरोग्य केंद्र, महानगरपालिका प्रभाग समिती ड कार्यालयाशेजारी, आरोग्य विभाग कार्यालयाचे खाली, नवघर, वसई (प.)
- जुचंद्र दवाखाना / आरोग्य केंद्र, जुचंद्र गाव, नायगाव (पूर्व)
- उपरोक्त सर्व रुग्णालय नागरी आरोग्य केंद्र व दवाखानो यांना लागणारी औषधे मंजूर निविदाधारकांकडून खरेदी करण्यात येऊन पुरविली जातात.

**जैविक कचरा :**

सर्व ठिकाणी तयार होणारा जैविक कचरा एनव्हायरो व्हिजील या संस्थेमार्फत गोळा केला जातो. व सदर कचऱ्याची प्लांट मधून विल्हेवाट लावली जाते.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' कार्यालयांतर्गत नालासोपारा पूर्व येथील प्रिन्स पार्क, विजयनगर भागात महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या नवीन वास्तूचे बांधकाम पूर्ण झाले असून ते सुरु करण्यात आले आहे.

## ✣ भाग - ६ ✣

# आपत्ती व्यवस्थापन

सविनय सादर,

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या राज्य कार्यकरणी समितीच्या दि. १९ जून २०१२ रोजी झालेल्या बैठकी दरम्यान महाराष्ट्रातील शहरांमधून (महानगरपालिका) आपत्ती सौम्मीकरण करणे महत्त्वाचे आहे. तसेच शहराच्या लगतचा परिसर सुध्दा आपत्ती विरहीत होणे गरजेचे आहे. या करिता सदर बैठकी दरम्यान महाराष्ट्र राज्यातील मोठया महानगरपालिकांना प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र म्हणून संबोधण्यात आले. हयात पुणे, ठाणे, नाशिक, नांदेड, नवी मुंबई, सांगली, सोलापूर, अमरावती, नागपूर, औरंगाबाद या दहा महानगरपालिकेचा समावेश आहे. प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र म्हणून या महानगरपालिकांवर स्वत:चा व शेजारील काही जिल्हे आपत्ती सौम्मीकरण करण्याकरीता व प्रतिसाद देणे करीताची जबाबदारी देण्यात आली आहे. राज्यातील उर्वरीत १४ महानगरपालिकांना विना प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र म्हणून संबोधण्यात आले. हयात मीरा - भाईंदर, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी-निजामपूर, वसई - विरार, पिंपरी- चिंचवड, कोल्हापूर, लातुर, अकोला, मालेगांव, जळगांव, अहमदनगर, धुळे, चंद्रपूर यांचा समावेश आहे. सदर महानगरपालिकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील आपत्तीचे सौम्मीकरण व प्रतिसाद देणे करीताची जबाबदारी देण्यात आली आहे.

सर्व महानगरपालिकांना आपत्ती व्यवस्थापन संबंधित आपत्ती पूर्व - दरम्यान- नंतरचे कार्य करावे लागते अशा वेळी येणाऱ्या अडचणी व कार्याचे सुसुत्रिकरण करणे करीता महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांचा दि. २५ जुलै २००६ च्या आदेशानुसार व दि २१ जुलै २०१२ च्या निर्णयानुसार सर्व राज्यात प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र व विना प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र प्रस्थापित करुन सदर केंद्रा मार्फत शहरातील आपत्ती धोकेनिहाय परिस्थितीची तिव्रता कमी करणे व आपत्तीजन्य परिस्थितीत तात्काळ मदतकार्य पुरविण्याची जबाबदारी सदर नियंत्रण कक्षाची असते. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, भारत सरकारच्या इंन्सिडन्ट रिस्पॉन्स सिस्टिम (आयआरएस) च्या मार्गदर्शक सुचना नुसार सदर नियंत्रण कक्ष हे आपत्ती काळात कार्य करणाऱ्याप काळात कार्य करणाऱ्या सर्व शासकीय विभागांचे केंद्रस्थान असते.

आपती व्यवस्थापन केंद्रात ५ कर्मचारी (वायरलेस ऑपरेटर, संगणक चालक, टेलिफोन ऑपरेटर, मॅनेजर वगैरे), ३ डयुटी ऑफिसर, १ आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, ३ वाहन चालक, ३ शिपाई इ. महत्त्वाच्या व्यक्तींचा समुह २४ x ७ x ३६५ दिवस कार्यरत असतो. तरी सदर समुहास आपत्ती

व्यवस्थापनाचे कार्य करण्याकरीता जागेची आवश्यकता आहे. तसेच यासोबत आपत्तीजन्य परिस्थितीत व इतर वेळी मा. आयुक्त व समिती सदस्य यांना संबंधित कार्य करण्याकरीता किंवा बैठकी घेण्याकरीता सभागृहाची आवश्यकता आहे.

तरी उपरोक्त व्यक्तींकरीता / विभागाकरीता स्वतंत्र कार्यालय उभारणीसाठी कमीतकमी ५०० चौरस मीटरची जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. सदर जागेमध्ये आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कार्यालय, अधिकारी वर्गाकरिता २ केबिन, ८ नियंत्रण कक्ष कर्मचाऱ्यांकरीता बसण्याची व्यवस्था व चोवीस तास कक्ष चालू असल्याने आराम करण्याकरीता व चेजींग रुम (महिला व पुरुष) करिता २ खोली असणे आवश्यक आहे.

सदरचे कार्यालय शासकीय नियमानुसार मुख्य कार्यालयामध्ये किंवा त्यांच्या शेजारी असणे आवश्यक आहे. जेणेकरुन आपत्तकालिन परिस्थतीत मा. आयुक्तांना तात्काळ आपत्ती संबंधी माहितीचे देवाण घेवाण करणे सोयीचे होईल. परंतु सद्या मुख्य कार्यालयामध्ये व त्याच्या शेजारी आवश्यक तेवढी जागा कक्ष स्थापन करण्यासाठी उपलब्ध नाही व असलेल्या जागेमध्ये नविन इमारत तात्काळ बांधणे शक्य नाही. तरी सदर विभागाकरिता जागेची पाहणी केली असता नवघर -माणिकपूर विभागीय कार्यालय कार्यक्षेत्रातील दिवाणमान येथे महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीत आपत्ती व्यवस्थापन विभागाकरिता आवश्यक असलेली जागा उपलब्ध आहे. सदरची जागा ही आपली व्यवस्थापन केंद्रासाठी वापरण्यास स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे.

तसेच सदर जागेत कार्यालय व नियंत्रण कक्षाकरीता महानगरपालिका निधीतून आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, तज्ञ व्यक्ती व आयुक्त यांचेसाठी तीन दालने, कर्मचारी वर्गासाठी आसन व्यवस्था, मिटींग हॉल. केबल टि.व्ही. तसेच कार्यालयाचे इंटेरियर, कपाटे इत्यादी कामाकरीता पालिका निधीतून अंदाजे २५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

सदर नियंत्रण कक्ष २४ x ७ x ३६५ दिवस कार्यान्वयीत ठेवणे व कार्यालयीन कामकाजाकरीता मनुष्यबळाची आवश्यकता अहो. शासकीय निर्देशानुसार सदरचे मनुष्यबळ हे महानगरपालिकेने उपलब्ध करावयाचे आहे. त्यामुळे सदर मनुष्यबळाकरीता लागणारे मानधन/भत्ते/वेतन याकरीता लागणाऱ्या निधीची उपलब्धता महानगरपालिका निधीतून करावे लागणार आहे. तरी सदरची कामे करण्यासाी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणे कामी मा. स्थायी समिती पुढे मान्यतेसाठी मंजुरी आवश्यकता आहे.

महानगरपालिका क्षेत्रात आपत्ती पूर्व नियोजनाकरीता विविध प्रभागातून तसेच सर्व शासकीय यंत्रणांचे क्षमतावर्धन, जनजागृती, प्रशिक्षण शिबिरे, नियंत्रण कक्षा करीता VHF यंत्रणा, संगणक, यंत्रणा, नियंत्रण कक्षाचे सॉफ्टवेअर व आपत्ती व्यवस्थापनाकरीता लागणारे साहित्य वगैरे याकरीता शासनाकडून मिळालेल्या ५० लक्ष सहाय्यता अनुदानाचे (निधीचे) विनियोग करण्याकरीता महानगरपालिके मार्फत नेमण्यात आलेल्या सल्लागार यांच्या सुचनानुसार खर्चाचे विनियोग करुन तात्काळ संबंधित खर्चाचे समायोजन शासनास सादर करणे आवश्यक आह सदरचे समायोजन शासनास सादर केल्यानंतर पुढील निधी तात्काळ प्राप्त करणे शक्य होईल. तरी सदर सहाय्यता अनुदानाचे (निधीचे) विनियोग करण्याकरीता स्थायी समितीची मंजुरी मिळण्यास विनंती.

## सन २०१३ -१४ करीता महानगरपालिका निधीतून होणाऱ्या खर्चाचा तपशील

| मुद्दा क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजित खर्च | निधीची उपलब्धता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | आपत्ती व्यवस्थापन कार्यालय व नियंत्रण कक्षाकरीता जागा | - | - | नवघर-माणिकपूर विभागीय कार्यालय कार्यक्षेत्रातील दिवाणमान येथील जागा |
| २. | आपत्ती व्यवस्थापन कार्यालय व नियंत्रण कक्षाकरीता इंटिरीअर, कार्यालयीन साहित्य वगैरे करीता | २० लक्ष | महानगरपालिका निधी मधून | |
| ३. | आपत्ती व्यवस्थापन कार्यालय व नियंत्रण कक्षा करीता लागणारे मनुष्यबळ | ५ लक्ष | महानगरपालिका निधी मधून | महानगरपालिका कर्मचाऱ्यांना / अधिकारी यांना सदर विभागात बदली / वर्ग करणे व आवश्यकता भासल्यास पालिका कंत्राटी पध्दतीने भरती करणे. |

## शासनाच्या सहाय्यता अनुदान खर्चाचा तपशील

### तक्ता - ब

| मुद्दा क्र. | कामाचे स्वरुप | अंदाजित खर्च | निधीची उपलब्धता | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | आपत्ती व्यवस्थापन विभागा करीता राज्य शासनाकडून मिळालेल्या खालील कामांकरीता<br>• विविध प्रभागातून तसेच सर्व शासकीय यंत्रणांचे क्षमतावर्धन<br>• जनजागृती, प्रशिक्षण शिबिरे<br>• नियंत्रण कक्षा करीता VHF यंत्रणा संगणक यंत्रणा, नियंत्रणा कक्षाचे सॉफ्टवेअर<br>• आपत्ती व्यवस्थापनाकरीता लागणारे साहित्य वगैरे | ५० लक्ष | शासनाकडून मिळालेले सहाय्यता अनुदान | नवघर-माणिकपूर विभागीय कार्यालय कार्यक्षेत्रातील दिवाणमान येथील जागा |

महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या राज्य कार्यकरणी समितीच्या दि. १९ जुन २०१२ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयात महाराष्ट्रातील शहरांचे (महानगरपालिका) आपत्ती सौम्यीकरण करणे महत्त्वाचे आहे. त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेस ५० लक्ष निधी मिळालेला असून सदरचा निधी उपरोक्त तक्ता (ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे व शासनाच्या निर्देशाप्रमाणे करावयाचा आहे.

सदर विभागची खालील दर्शविल्याप्रमाणे अत्यावश्यक सेवांच्या कार्यालयातील प्रमुख अधिकारी व पदाधिकारी यांची समिती तयार करणे आवश्यक आहे.

### आपत्ती व्यवस्थापन समिती

**आयुक्त, महानगरपालिका**
**अध्यक्ष**

**महापौर**
**सह अध्यक्ष**

**उपायुक्त आपत्ती व्यवस्थापन**
**सचिव**

**आपत्ती व्यवस्थापन अधिकारी**
**सह सचिव**

## सदस्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस (डि.वाय.एस.पी.) | २. | सहाय्यक आयुक्त भांडार विभाग (म.न.पा.) | ३. | शहर अभियंता (म.न.पा.) |
| ४. | कर्यकारी अभियंता पाणी पुरवठा (म.न.पा.) | ५. | कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग (म.शा.) | ६. | कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा (म.शा.) |
| ७. | अभियंता विद्युत (म.न.पा.) | ८. | कार्यकारी अभियंता, विद्युत (म.शा) | ९. | वैद्यकीय आरोग्य अधिकारी (म.न.पा.) |
| १०. | वैद्यकीय अधिकारी (म.शा.) | ११ | सार्व. आरोग्य अधिकारी स्वच्छता विभाग (म.न.पा.) | १२ | कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग |
| १३ | मुख्य अधिकारी अग्निशमन दल (मनपा) | १४ | आर.टी.ओ. वसई | १५. | जॉईट डायरेक्टर इंडस्ट्रीयल हेल्थ ॲण्ड सेफ्टी यांचे प्रतिनिधी |
| १६ | केस्ट गार्ड वसई | १७ | नोडल ऑफीसर एमटीएनएल/बीएसएनएल | १८ | वरिष्ठ अधिकारी पश्चिम रेल्वे |
| १९. | नायब तहसिलदार, महसुल विशेष आमंत्रित सदस्य | २० | एन.डी.आर.एफ. विशेष आमंत्रित सदस्य | २१ | प्रशासकीय अधिकारी जिल्हा होमगार्ड ठाणे |
| २२. | पेट्रोल पंप/गॅस एजन्सी (कंपनी ऑफिसर) विशेष आमंत्रित सदस्य | २३ | नोडल ऑफीसर मोबाईल कंपनी विशेष आमंत्रित सदस्य | २४ | एनजीओ विशेष आमंत्रित सदस्य |

तरी उपरोक्त सदर विभागाकरीता आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापित करणे आवश्यक आहे. या समिती मार्फत आपल्या शहरातील आपत्तीची तिव्रता कमी करणे तसेच घटना व प्रतिसाद यामधील वेळेचे अंतर कमी करणे करीता योग्य ते उपाय योजना करणे व त्याकरीता शासनाद्वारे प्राप्त झालेल्या आर्थिक तरतुदीचे विनियोग करणे व महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात प्रति वर्षी आर्थिक तरतुद करणे कामी जबाबदारी सदर समितीची असेल.

# ✣ भाग - ७ ✣

## शैक्षणिक सुविधा

**शिक्षण :**

व.वि.श.म.च्या स्वतःच्या मालकीच्या शाळा नाहीत, कार्यक्षेत्रातील शाळा या जि. प. ठाणे व खाजगी संस्थाच्या मालकीच्या व संचालित आहेत. हे क्षेत्र ठाणे जिल्हयात येत असल्यामुळे येथील शाळा जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जातात.वसई क्षेत्रात एकूण २१३ जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. २२ महाविद्यालय, ३९ कनिष्ठ महाविद्यालय, अपंग व मुकबधीरांसाठी ४ शाळा असे विरार शहर महानगरपालिकेत आहे.



**विवा कॉलेज**

# ✣ भाग - ८ ✣

# शहर सुशोभीकरण

## वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील उद्याने

**एकूण उद्याने - ७३**

**ठेका तत्वावर देखभाल - ६९ उद्याने**

**पालिका यंत्रणेद्वारे देखभाल -४ उद्याने**

**उद्यानांची सूची**

| क्र. | विरार विभाग | क्र. | नालासोपारा विभग |
|---|---|---|---|
| १ | विराटनगर वैकुंठ स्मशानभुमी प. | १ | सिरॉक उद्यान वसाहत तुळीज रोड पू. |
| २ | विराटनगर बालउद्यान चाणक्य चौक प. | २ | जयेश उद्यान महेश पार्क पू. |
| ३ | एकदंत बालउद्यान विराटनगर प. | ३ | ममता उद्यान आचोला चंदन नाका, संयुक्त नगर पू. |
| ४ | बालउद्यान, नॅशनल स्कूल मागे प. | ४ | चंदेश कुंभ रांजणपाडा, आचोले पू. |
| ५ | शक्ती कॉम्प्लेक्स उद्यान प. | ५ | कालिंदी उपा. संयुक्तनगर आचोले पू. |
| ६ | कामनवाला कॉम्प्लेक्स प. | ६ | आचोले गांव तलाव पू. |
| ७ | सायन्स विज्ञान उद्यान प. | ७ | खुला रंगमंच मजिठिया पार्क पू. |
| ८ | वृक्ष नक्षत्र व वनस्पती उद्यान प. | ८ | ज्योती अपा. पाटील हॉस्पिटल जवळ प. |
| ९ | विवा उद्यान एम.बी. इस्टेट प. | ९ | वृंदावन उद्यान |
| १० | कैक.म. ऊर्फ बापूजी चौधरी परिक्रमा व बाल उद्यान डोंगरपाडा प. | १० | गणेश उद्यान शनिमंदिर प. |
| ११ | डोंगरपाडा बायपास उद्यान प. | ११ | छेडानगर, लक्ष्मीबेन उद्यान |
| १२ | चाचा नेहरु नारंगी उद्यान प. | १२ | अथर्व उद्यान समेळपाडा |
| १३ | नारंगी गांव तलाव उद्यान | १३ | महात्मा फुले नगर समेळपाडा |
| १४ | दुध दर्या फुलपाडा उद्यान पू. | १४ | सोपारा गाव उद्यान |
| १५ | तारवाडी बाल उद्यान सुर्यकिरण पू. | १५ | चक्रेश्वर तलाव उद्यान |
| १६ | तारवाडी उद्यान रेल्वे ट्रॅकजवळ पू. | १६ | राहुल इंटरनॅशनल उद्यान |
| १७ | मनवेलपाडा तलाव पू. | १७ | झालावाड दर्शन उद्यान |
| १८ | वासुदेव बालू पाटील मनवेलपाडा उद्यान पू. | १८ | नागेला तलाव उद्यान |
| १९ | कै. अँड सी.पी. सोलंकी परिक्रमा व नौकाविहार केंद्र पू. | | |
| २० | मातृछाया गार्डन पू. | | |
| २१ | गोपरपाडा तलाव उद्यान | | |
| २२. | रानळे तलाव उद्यान | | |

| क्र. | नवघर माणिकपूर विभाग | क्र. | वसई विभाग |
|---|---|---|---|
| १ | सागर सरिता उद्यान | १ | हुतात्मा बाळा सावंत स्मारक पापडी |
| २ | चुळणा स्मशानभूमी, चुळणा बाभोळा | २ | लोकमान्य टिळक उद्यान भास्कर आळी |
| ३ | वीर जिजामाता उद्यान | ३ | कोळीवाडा उद्यान वाल्मिकी मंदिर |
| ४ | ओमनगर उद्यान मैदान दिवाणमान | ४ | डिव्हायडर ताम तलाव उद्यान |
| ५ | दिवाण कुलदिपसिंग उद्यान, दिवाणमान | | |
| ६ | सी कॉलनी उद्यान मैदान दिवाणमान | | |
| ७ | अपना घर मागील बाजूस उद्यान | | |
| ८ | मैत्रीपार्क उद्यान नं. १ दिवाणमान | | |
| ९ | मैत्रीपार्क उद्यान नं. २ दिवाणमान | | |
| १० | चिमाजी आप्पा उद्यान मैदान दिवाणमान | | |
| ११ | मुक्तीधाम मैदान दिवाणमान | | |
| १२ | मिना नगर उद्यान मैदान दिवाणमान | | |
| १३ | अष्टविनायक उद्यान प. | | |
| १४ | नवयुगनगर उद्यान मैदान चुळणे | | |
| १५ | मणिटेपार उद्यान मैदान चुळणे | | |
| १६ | चुळणा वाभोळा रोड उद्यान मैदान चुळणे | | |
| १७ | खलाटीपाडा उद्यान मैदान चुळणे | | |
| १८ | हॅपी कसल उद्यान नवघर | | |
| १९ | स्व. किरण गव्हाणकर उद्यान मैदान माणिकपूर | | |
| २० | सर सेनापती अरुणकुमार वैद्य उद्यान पाण्याची टाकी नवघर | | |
| २१. | नवघर पूर्व पाण्याच्या टाकीखाली उद्यान नवघर | | |
| २२. | नवघर स्मशानभूमी उद्यान | | |
| २३ | उमेळमान स्मशानभूमी उद्यान | | |
| २४ | दिवाणमान स्मशानभूमती उद्यान | | |
| २५ | माणिकपूर पाण्याची टाकी उद्यान | | |
| २६ | विद्यामंदिर पाण्याची टाकी उद्यान | | |
| २७ | ग्रास रोड परिसर उद्यान | | |
| २८ | सनसिटी परिसर उद्यान | | |
| २९ | चुळणा तलाव परिसर उद्यान | | |

## प्राचीन बौध्द स्तुपाचे व परिसराचे सुशोभिकरण करणे.

वसई - विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नालासोपारा शहराच्या लगत मर्देस येथे सर्वे क्र. ७५ हिस्सा नं. (ब) या जागेत प्राचीन बौध्द स्तुप आहे. सदर बौध्द स्तुपास ऐतिहासीक पार्श्वभूमी असुन एका व्यापाऱ्याने भगवान बुध्दांचे प्रवचन ऐकले व तो प्रभावीत झाला व अर्हता भिकू बनला व त्याने सुप्पारक नगरीत (वर्तमान नालासोपारा) चंदनाच्या लाकडाचे विहार बांधले व त्याचे उद्‌घाटन प्रत्यक्ष तथागत भगवान बुध्दांच्या हस्ते केले. त्या विहारात भगवान बुध्दांचे भिक्षा पात्र होते. कालांतराने इ. पु. २४६ मध्ये (भगवान बुध्दांच्या महापरिनिर्वाणानंतर २११ वर्षांना) सम्राट अशोकाने त्याच विहाराच्या ठिकाणी भिक्षा पात्रावर "सुप्पारक बौध्द स्तुप" बांधला अशी ऐतीहासीक पार्श्वभूमी आहे.

सद्यस्थितीत सदर बौध्दस्तुपाची मोठ्या प्रमाणात पडझड झालेली असून, ऐतिहासीक वास्तूचे महत्व लक्षात घेऊन व सदरचा बौध्द स्तुप तत्कालीन नालासोपारा नगरपरिषदेच्या क्षेत्राबाहेर असल्यामुळे सदर बौध्दस्तुपाचा विकास व सुशोभिकरण करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत तत्कालीन नालासोपारा नगपरिषदेचे नगराध्यक्ष मा. श्री. उमेशजी नाईक यांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले व केंद्रशासन स्तरावर व राज्यशासन स्तरावर मोठ्या प्रमाणात पत्रव्यवहार केला व सदर बौध्दस्तुपाचा विकास सुशोभिकरण करण्यासाठी तत्कालीन नालासोपारा नगपरिषदेस परवानगी मिळणेबाबत शासनास विनंती केली. त्याचाच एक भाग म्हणून तत्कालीन नालासोपारा नगरपरिषद सदर बौध्द स्तुपाच्या विकासासाठी व सुशोभिकरण करण्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली होती व सदरची कामे करण्यासाठी शासनाकडे पत्रव्यवहार करून पाठपूरावा केला. परवानगी प्राप्त न झाल्यामुळे तत्कालीन नालासोपारा नगरपरिषदेने स्वत:च्या निधीतून सुमारे १३.०० लाख रु. खर्च करून सांची येथे असलेल्या कमानीनुसार भव्य अशा कमानीचे बांधकाम सन २००९ साली पूर्ण केले. याचे श्रेय साहजिकच मा. नगराध्यक्ष श्री. उमेशजी नाईक यांना जाते.

सदर बौध्द स्तुपाचा विकास व परिसराचा विकास व सौदर्यीकरण करण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने रु. १.०० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर बौध्दस्तुपापासुन जवळच उभारलेल्या कमानीच्या शेजारी म्हणजे मौजे गास सर्वे क्र. ३५४ मध्ये सुमारे ९'६" उंचीच्या व सुमारे ५ टन वजनाचा भगवान गौतम बुध्दांच्या पुतळ्याची विधिवत पुजा करून पुतळा उभारणेंत आलेला आहे. तसेच मौजे सोपारा सर्व्हे नं. ३२ येथेही गौतम बुध्दांचा पुतळा बसविणेत आला असून सदर दोन्ही ठिकाणचे सुशोभिकरण करणेचे काम लवकरच महानगरपालिकेमार्फत पूर्ण करणेत येत आहे.

महानगरपालिकेस नियोजन प्राधिकरणाच्या दृष्टीकोनातून नियोजन आराखड्यात काही बदल करण्याची आवश्यकता आहे. मौजे करमाळे/बोळींज गावातील १४३६५८.४० चौ. मी. इतके क्षेत्र "बुध्दीष्ठ हेरीटेज व कल्चरल सेंटर" साठी वापर करण्याचे विचारात असून सदर आरक्षणातून पर्यटन केंद्र विकसीत करावयाचे आहे. यापैकी ७६९२९.१६ चौ. मी. इतकी खाजगी जागा असून ती जमीन मालकांशी वाटाघाटी करून संपादीत करावयाची आहे. परंतू लागवड क्षेत्रात टी.डी.आर. लागू नाही. तसेच शासनाच्या महसूल खात्याकडून उर्वरीत ६६७२९.४४ चौ.मी. क्षेत्र शासनाने महानगरपालिकेस हस्तांतर करणे गरजेचे आहे. सदरची जागा मंजूर विकास आराखड्याप्रमाणे झोन क्र. ९ मध्ये असून बागायत (प्लांटेशन झोन) मध्ये आहे. सेस संस्था (केरळ) ह्यांच्या प्रकाशित केलेल्या सि. आर. झेड. नकाशा नुसार सि. आर. झेड. ने बाधित नाही.

सदर जागा महापालिकेत हस्तांतर झाल्यास सदर ठिकाणी हेरीटेज सेंटर, ध्यान केंद्र, उद्यान विकसीत करणे, बौध्द स्तुपाचा इतिहास चित्रबध्द करून स्लाईड शो तयार करणे, वस्तुसंग्रहालय विकसीत करणे यासारखी विविध प्रकारची विकास कामे करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील निर्मळ येथील विमल तलावाचे पुर्नजिवीतीकरण करणे.

उपरोक्त विषयांकित कामाच्या वसई विरार शहर महानगरपालिके मार्फत विमल तलावाच्या सुशोभिकरणाच्या शासनास सादर केलेल्या ९.५३ कोटीच्या प्रस्तावास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागामार्फत शासन निर्णय क्र. रासयो-२०११/प्र.क्र.१४८/ता.क्र. ३, दि. २१ मार्च २०११ अन्वये प्रशासकिय मान्यता दिली असून त्यापैकी ७०% टक्के निधी राज्य शासनाकडून उपलब्ध होणार असून उर्वरीत ३०% निधी महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**उद्यानासाठी प्रस्तावित प्रकल्प :**

व.वि.श.म. पा. ने एक सर्पोद्यान व Botanical Garden बांधण्याचे प्रस्तावित केले आहे.
सुरूचि बाग, अर्नाळा, कळंब, रानगाव अशी इतरही पर्यटन क्षेत्रे येथे आहेत.

कळंब येथील समुद्र किनारा हे एक सुंदर, रमणीय व दुर्लक्षित ठिकाण होते. ते बरेच आत असल्यामुळे ते दुर्लक्षित राहिले होते.परंतु आता हे ठिकाण तेथील फुलांच्या / भाज्यांच्या शेतीमुळे माहित झाले आहेत. येथील लोकांचा मुख्य व्यवसाय हा मासेमारी, फुलांची शेती व शेती हा आहे. येथील लोकांचे

राहणीमान हे साधे पण आनंददायी आहे. रस्त्यांच्या दुतर्फांना छोटे छोटे बंगले बांधलेले दिसतात. यामुळे देखील या जागेचे वेगळेपण दिसून येते.येथील समुद्र किनारा हा शांत व रमणीय आहे.

परंतु येथे वाहतूक, रहाण्याच्या, खाण्यापिण्याच्या सोई उपलब्ध नसल्यामुळे तेथे एखाद्या हॉटेलात पूर्वसूचना देऊन राहण्यास जावे लागते.

सागरी किनारपट्टी नियमनक्षेत्रानुसार महानगरपालिकेने असे क्षेत्र संरक्षित केले आहे. अशा ठिकाणी महानगरपालिकेने नविन बांधकामास मनाई केली आहे. खारफुटीच्या झाडांच्या लागवडीस प्रोत्साहन दिले आहे.

**तलावांचे सुशोभिकरण :**

तलाव, सरोवर आणि जलाशय या स्थानिक लोकांच्या अत्यावश्यक गरजा भागवण्याबरोबरच पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महत्त्वाची कामगिरी बजावतात. ही स्थळे स्थलांतरीत पक्षांना निवारा, पावसाचे पाणी साठवून भुजल पातळी वाढवणे, जलचर प्राणी व वनस्पती यांची जैवविविधता अबाधित ठेवणे, तसेच जल विहारासारखी मनोरंजनाची स्थळे म्हणून फार उपयुक्त ठरलेली आहेत.



सद्य स्थितीत राज्यातील तलाव, सरोवरे व मोठे जलाशय यांच्या संवर्धधनाकडे पाहिजे त्या प्रमाणात स्थानिक पातळीवर लक्ष दिले गेले नाही व बहुतांश जलाशयाची दुरावस्था झालेली आढळून येते. त्यामुळे जलाशयांच्या संवर्धनासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना सुरु केली आहे.

या योजने अंतर्गत केंद्र शासनाकडून जलाशयांच्या संवर्धनासाठी ७० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. उर्वरित ३० टक्के निधी स्थानिक स्वराज्य संस्था, विश्वस्त संस्था, राज्यशासन यांनी उपलब्ध करुन द्यावयाचा असतो या योजनेत सर्वसाधारणपणे खालील मुख्य कामांचा समावेश होतो.

तलावा अंतर्गत जैव प्रक्रियेद्वारे तलावातील पाण्याची गुणवत्ता सुधारणे.

प्रदूषणाचे स्त्रोत निश्चित करुन तलावातील पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी उपाययोजना करणे.

तलावात साचलेला घातक व ऑरगॅनिक गाळ काढणे.

तलावाच्या पाणवाह क्षेत्राची धूप रोखण्यासाठी उपाययोजना करणे.

तलावातील अनावश्यक व उपद्रवी वनस्पती नष्ट करुन त्यांची वाढ नियंत्रणात आणण्यासाठी उपाय योजना करणे.

किनारा सौंदर्यीकरण, हरितपट्टा विकसित करणे, कुंपण घालणे, मनोरंजनासाठी बालोद्यान, नौका विहार इ.

जनसहभाग व जनजागृती कार्यक्रम तसेच स्थानिक परिस्थितीनुसार करावयाच्या अतिरिक्त उपाययोजना.

## ✣ तलाव ✣

१. एकात्मिक सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत निर्मळ येथील विमल तलावाचे पुर्नजिवीतीकरण करणे हे काम प्रस्तावित आहे.

२. गास येथील भट्टीला तलाव सुशोभिकरण कामे सुरु.

३. नाले तलाव सुशोभिकरण करणे सुरु.



## ✣ गार्डन ✣

१. मोरगांव तलाव येथील गार्डनचे काम सुरु आहे.

२. शांतीपार्क गार्डनचे काम सुरु आहे.



# वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील तलावांची सूची

## HERITAGE BUILDING AND PRECINCTS IN

## VASAI VIRAR SUB- REGION

1.VIRAR

| No | NAME | OWNERSHIP | BUILT IN | CONDITION | GRADE |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Naringi Talav | VVCMC | 19th Century | Good | III E |
| 2 | Naringi Zilla Parishad School | Zilla Perishad | 1900 | Poor | III |
| 3 | Dongrapada Gav Talav | VVCMC | 16th Century | Poor | III E |
| 4 | Vartakwada Talav | VVCMC | 16th Century | Good | III E |
| 5 | Totale Talav | VVCMC | 16th Century | Good | I E |
| 6 | Manvelpada Talav | VVCMC | 16th Century | Good | II E |
| 7 | Ranele Talav | VVCMC | 16th Century | Poor | II E |
| | 2. NALASOPARA | | | | |
| 8 | Chakreshwar Talav | VVCMC | ……… | Poor | I E |
| 9 | Sopara Zilla Parishad School | Zilla Parishad | 1894 | Poor | III |
| 10 | Burhanpur Chowk Market Precint | VVCMC | 16th Century | Poor | |
| 11 | Rehmatulla Alleya Dargah | Trust | 1555 | Poor | III |
| 12 | More Talav | Disputed | 16th Century | Poor | III E |
| 13 | Nagela Talav | VVCMC | 16th Century | Poor | II E |
| 14 | Achole Talav | VVCMC | 16th Century | Good | I E |
| | 3. NAVGHAR MANIKPUR | | | | |
| 15 | Chulne Talav | VVCMC | 16th Century | Fair | I E |
| 16 | Khargoda Talav | VVCMC | 17th Century | Fair | I E |
| 17 | Nazareth Talav | VVCMC | 17th Century | Fair | I E |
| 18 | Diwanman Talav | VVCMC | 16th Century | Good | III E |
| 19 | Umeleman Talav | VVCMC | 17th Century | Good | III E |
| 20 | Papdy Talav | VVCMC | 16th Century | Poor | I E |

| No | NAME | OWNERSHIP | BUILT IN | CONDITION | GRADE |
|---|---|---|---|---|---|
| 21 | Bondali Talv | VVCMC | 18th Century | Poor | II E |
| 22 | Taam Talav | VVCMC | 16th Century | Poor | II E |
| 23 | Agashe Talav | Trust | 18th Century | Fair | I E |
| 24 | Don Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | II E |
| 25 | Bhongale Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | III E |
| 26 | Sathphle Gav Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | III E |
| 27 | Sambhale Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | I E |
| 28 | Kofras Talav Precinct | ……… | 16th Century | Good | …. |
| 29 | Kofrad Talav | Grampanchayat | 16th Century | Good | II E |
| 30 | Boling Talav | Grampanchayat | 17th Century | Good | I E |
| 31 | Karmale Soneri Talav | Gram panchayat | 17th Century | Fair | III E |
| 32 | Kudhavat Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | III E |
| 33 | Umbrale Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | I E |
| 34 | Nale Talav | Grampanchayat | 16th Century | Good | I E |
| 35 | Bhandale Talav | Grampanchayat | 16th Century | Good | III E |
| 36 | Mardes Talav | Trust | 16th Century | Fair | I E |
| 37 | Ashok Stup | ASI | 3th Century | Poor | I |
| 38 | NAvale Talav | Gram panchayat | 16th Century | Fair | III E |
| 39 | Ambat Bav Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | III E |
| 40 | Andala Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | III E |
| 41 | Ghas Mothe Talav | Grampanchayat | NA | Fair | I E |
| 42 | Kalunj Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | I E |
| 43 | Shirmoli Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | II E |
| 44 | Batela Talav | Grampanchayat | NA | Poor | I E |
| 45 | Dargha And Ldgah Grounds | Trust | 16th Century | Fair | III |
| 46 | Indiani, Goliai Varala Talav | Gram panchayat | 16th Century | Fair | II E |
| 47 | Vimal Talav | Gram panchayat | NA | Fair | I E |
| 48 | Malai Talav | Grampanchayat | NA | Fair | I E |
| 49 | Kumbhar Talav | Gram panchayat | 16th Century | Poor | I E |

| No | NAME | OWNERSHIP | BUILT IN | CONDITION | GRADE |
|---|---|---|---|---|---|
| 50 | Khurd Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | II E |
| 51 | Bhola Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | II E |
| 52 | Gorlai Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | III E |
| 53 | Dongri Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | I E |
| 54 | Girij Talav | Gram panchayat | 16th Century | Fair | I E |
| 55 | Motha Talav | Gram panchayat | 16th Century | Fair | III E |
| 56 | Rangaon Talav | Gram panchayat | 16th Century | Poor | III E |
| 57 | Devali Talav | Gram panchayat | 16th Century | Poor | III E |
| 58 | Barmala Talav | Gram panchayat | 16th Century | Fair | II E |
| 59 | Saloli Talav | Gram panchayat | 16th Century | Fair | II E |
| 60 | Relba Talav | Gram panchayat | 16th Century | Poor | III E |
| 61 | Dev Talav | Gram panchayat | 18th Century | Fair | III E |
| 62 | Mulgaon Talav | Gram panchayat | 16th Century | Fair | III E |
| 63 | Chaubare Talav | Gram panchayat | 16th Century | Fair | III E |
| 64 | Vadavali Talav | Trust | 16th Century | Poor | II E |
| 65 | Umela Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | III E |
| 66 | Goda Talav | Grampanchayat | 16th Century | Good | II E |
| 67 | Gandhi Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | III E |
| 68 | Peerancha Talav | Grampanchayat | 15th Century | Poor | I E |
| 69 | Ambe Talav | Grampanchayat | 15th Century | Poor | II E |
| 70 | Rajavali Gav Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | II E |
| 71 | Vagrapada Vanicha Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | III E |
| 72 | Vagrapada Peerancha Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | II E |
| 73 | Vagrapada Sonucha Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | III E |
| 74 | Gokhivare Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | II E |
| 75 | Waliv Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | I E |
| 76 | Sativali Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | III E |
| 77 | Khadik Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | I E |

| No | NAME | OWNERSHIP | BUILT IN | CONDITION | GRADE |
|---|---|---|---|---|---|
| 78 | Dhaniv Gav Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | I E |
| 79 | Dhaniv Baug Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | II E |
| 80 | Ghanicha Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | I E |
| 81 | Kopri Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | II E |
| 82 | Raipada Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | I E |
| 83 | Shirgon Gav Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | II E |
| 84 | Samantpada Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | I E |
| 85 | Mandvi Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | I E |
| 86 | Kashid Talav | Grampanchayat | 19th Century | Poor | III E |
| 87 | Khardi Talav | Grampanchayat | 16th Century | Fair | III E |
| 88 | Koshimbe Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | I E |
| 89 | Dahisar Gav Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | III E |
| 90 | Dahisar Talav | Grampanchayat | 16th Century | Poor | I E |

वरील ९०तलावांच्या सुचीमधील ३४ तलाव हे सुस्थितीत आहेत आणि १३ तलाव हे बऱ्या स्थितीत आहे. उर्वरीत ४३ तलाव हे वाईट स्थितीत आहेत.

## ✣ भाग - ९ ✣

# पर्यावरण अहवाल - एक दृष्टीक्षेप

व.वि.श.म.पा. क्षेत्रातील पर्यावरण सद्यस्थिती वर दृष्टिक्षेप टाकतांना त्यांनी केलेल्या उपाययोजनांचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे -

१. सर्व नवीन इमारतींना एस.टी.पी. व रेन वॉटर हारवेस्टींग करणे बंधनकारक करणे.
२. झाडे लावणे.
३. भुयारी गटार योजना
४. ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे.
५. जुन्या जलवाहीन्या काढून नविन टाकाव्यात. पिण्याच्या पाण्याच्या टाक्या वेळोवेळी साफ करणे.
६. प्राणी व पक्षांच्या संरक्षणासाठी अभयारण्य उभारली जाणे.

वरील उपाययोजनांपैकी व.वि.श.म.पा. ने पर्यावरण संतुलन तथा प्रदुषण नियंत्रणाच्या दृष्टीने महत्त्वाचे असे पाऊल उचलले, ते म्हणजे वृक्षसंवर्धन समितीची स्थापना केली व त्याद्वारे सन २०१२-१३ मध्ये, १ लाख वृक्षरोपण करुन तेथील नागरीकांना वृक्षलागवड, संवर्धन करण्यांस प्रोत्साहन दिले.

तसेच रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प यशस्वीरित्या चालविण्यासाठी व.वि.श.म.पा. ने बांधकाम परवानगी देतांना प्रत्येक कंत्राटदारास, नागरीकास रेन वॉटर हार्वेस्टींगचे डिझाईन, प्लॅन यांची पूर्तता करणे बंधनकारक केले असून त्याची यशस्वीरित्या अंमलबजावणी करत व.वि.श.म.पा. ने २०१३-२०१४ मध्ये ३०० हून अधिक ठिकाणी बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी रेन वॉटर हार्वेस्टींग प्लान्ट कार्यान्वित केले आहेत.

प्राणी व पक्षी अभयारण्यासाठी व.वि.श.म.पा. ने वन विभागाकडून जागा घेऊन त्या ठिकाणी फळझाडे आणि इतर उपयुक्त वृक्षलागवड केली आहे. जेणेकरुन निरनिराळया पक्षांचे तेथे स्थलांतर होऊन पशुपक्ष्यांच्या संवर्धनास मदत होईल.

या व अशा अनेक उपक्रमांना राबवित व.वि.श.म.पा. पर्यावरण संतुलन व प्रदुषण नियंत्रणास प्रोत्साहन देत आहेत व त्याचप्रमाणे त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची अंमलबजावणी यशस्वीरित्या करण्याचा प्रयत्न करीत आहे. पुढील वर्षी त्यांनी पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने पुरक घटकांकडे लक्ष केंद्रित करुन जास्तीत जास्त पर्यावरण संतुलन तथा प्रदुषण नियंत्रण करण्याकडे भर देऊन नागरीकांना तसेच इतर संस्थांना स्वतःचा आदर्श घालून देत आहे.

## ✣ भाग - १० ✣

# वृक्ष संवर्धन

### वृक्ष लागवड व संरक्षण -

येथे आंबा, वड, पिंपळ, गुलमोहर, चिंच, सुबाभूळ, अशोक, नारळ, कडूलिंब इ. प्रकारची झाडे आढळून येतात. येथे चिमणी, कावळा, पोपट हे पक्षी व गाय, म्हैस, कुत्रा, मांजर इ. प्राणी या क्षेत्रात आढळतात. या क्षेत्रात किंवा जवळ कोणतेही अभयारण्य नाही. परंतु महानगरपालिकेने या क्षेत्रातील डोंगरावर असणारा भाग हा विकसित करण्याचे काम हाती घेतले आणि ते पूर्ण केले. यामुळे या क्षेत्राचे सौंदर्य वाढले आणि हे एक पर्यटन स्थळ झाले आहे.

स्थानिक प्रशासनाने स्थानिक नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून सांगून वृक्ष लागवड करुन घेतली. नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन ओसाड, नापिक जमिन सुपिक बनवल्या. वेळोवेळी काही ठराविक काळानंतर या लागवड केलेल्या वृक्षाची पाहणी करुन वाढलेली झाडे मोजली.

कारखान्यांमधून बाहेर पडणारा विषारी वायू शोषून घेण्यासाठी कोणती झाडे कोठे लावावीत व किती प्रमाणात लावावीत याची पाहणी करुन तशी लागवड करण्यात आली. त्यामुळे वायुप्रदुषणाचे प्रमाण कमी झाले आहे. CPCB ने $SO_2$ शोषून घेणाऱ्या वनस्पती शोधून काढल्या व नागरिकांनी त्यांची लागवड केली.

पाणी अडवा पाणी जिरवा यासारखे निरनिराळे उपक्रम राबविल्यामुळे पाण्याची पातळी कमी होण्याचे प्रमाण थांबले आहे. अशाप्रकारे वसई विरार महानगरपालिकेने निरनिराळे उपक्रम नागरिकांकडून राबवून घेतले व त्यामुळे वायूप्रदूषण, हवा प्रदूषण यांचे प्रमाण मर्यादीत आले आहे.

### वृक्ष लावडीसाठी डी.पी.आर. तयार करणे :

महानगरपालिका कार्यक्षेत्र ३११ चौ.कि.मी. इतक्या विस्तीर्ण क्षेत्रफळामध्ये अंतर्भूत असून भूतपूर्व नगरपरिषदा /ग्रामपंचायती, सामाजिक वनीकरण विभाग, वनविभागामार्फत मागील काही वर्षांमध्ये मोकळया जागा, रस्त्याच्या दुतर्फा विविध नेसर्गिक प्रजातींच्या झाडांची लागवड केलेली आहे.

महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर पालिका क्षेत्रामध्ये अधिकाधिक क्षेत्रावर मोठया प्रमाणामध्ये वृक्ष लागवड करणे या दृष्टीकोनातून मा. प्रथम महापौर महोदय यांचे कार्यकाळातील ठरावानुसार शिरगांव, चंदनसार व कणेर या गावातील कंपार्टमेंट क्र. ११३० व ११३१ मधील ३१५ एकर वनजमिनीवर माहे जून २०१३ मध्ये मिश्र व बांबू वनाची लावड करणेत आली आहे. त्याचे नियोजन, लागवड व संगोपन करणे आवश्यक आहे. या व भविष्यकाळामध्ये नर्सरीचा विस्तार करणे, पालिका हद्दीमध्ये अधिकाधिक क्षेत्रामध्ये हरितपट्टे तयार करणे, विविध नैसर्गिक प्रजापतींच्या झाडांचे रोपण करणे, संगोपन करणे, जमिनीची प्रतवारी व विभागानुसार भविष्यातील सर्व पायाभूत सुविधा, विकास कामांचा व अनुषंगिक सर्व बाबींचा अभ्यास करून येत्या दहा वर्षांसाठी प्रत्येक वर्षासाठी रोपांची निर्मिती करणे व लागवड करुन संगोपन करणे यासाठी सर्वेक्षण करुन डी.पी.आर. तयार करणेसाठी अनुभवी तज्ञ सल्लागार, व्यावसायिकांकडून जाहीर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविणे आवश्यक आहे.

## नागरी वनीकरण करणे :

शहरामधील अस्तित्वात व नियोजित रस्त्यांच्या दुतर्फा, शाळा महाविद्यालयांचे प्रांगण, सर्व धार्मिक स्थळांचा परिसर, सरकारी-खाजगी मोकळया जागा यावर अधिकाधिक रोपांची लागवड केल्यास शहरातील हवेमधील प्रदूषण कमी करुन ऑक्सिजनच्या प्रमाणामध्ये वाढ होईल, जल, जमिन, ध्वनीचे प्रदूषण कमी होवून पर्यावरण संवर्धनाचे काम वाढीस लागेल. परिणामी, परिसरामध्ये पर्जन्यमानाचे प्रमाण वाढेल. पावसाळी पाण्याचा भूगर्भामध्ये साठा वाढेल. पाण्यामधील समुद्री क्षारांचे प्रमाण कमी होवून पिण्यायोग्य पाण्याची पातळी वाढे व जमिनीची धूप थांबून जमिनीची प्रतवारी उंचावून जमिन सुपीक होईल व निसर्गातील सजीव सृष्टीस स्वास्थ्य व हितवर्धक आल्हाददायक वातावरणाची निर्मिती होईल. या Sustainable Green Development साठी महानगरपालिकेने रोपवाटिकेची निर्मिती केली असून दरवर्षी लाखो रोपांची निमीर्ती करुन परिसरामध्ये लागवड करणेचा उद्देश आहे.

## अवनत वनक्षेत्रावर वनीकरण करणे -

या अनुषंगाने महानगरपालिका अधिकाधिक Plantation करुन संवर्धन करण्याचा नेहमीच प्रयत्न करीत आहे. त्यासाठी सन २०१४-१५ चे पावसाळयामध्ये व त्यापुढील काळामध्ये शहरामध्ये वनखात्याच्या जमिनीवर त्रिसदस्यीय करार करुन गेल्या ३१५ एकर वनजमिनीवर केलेल्या वनीकरणासारखे मोठे प्रकल्प यावर्षीही करणेसाठी वनखात्याशी पत्रव्यवहार केला आहे. त्याचबरोबर शहरातील वरील ठिकाणी मोठया प्रमाणात नागरी वनीकरणासाठी प्र. सहाय्यक आयुक्तांकडून वृक्षारोपण करावयाच्या जागेचा तपशीलसुध्दा मागविण्यात आला होता. मात्र त्यासाठी प्राप्त प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने

ज्या ठिकाणी वृक्षारोपण करणे शक्य आहे त्या जागांची चालू व संभाव्य पायाभूत सुविधा, विकास कामांमुळे अशा जागा भविष्यात बाधित होणार नाहीत याबाबत विचार होवून वृक्षारोपण करावयाचे आहे.

महानगरपालिका हद्दीमध्ये जून २०१३ मध्ये चंदनसार, कणेर, शिरगांव येथे ३१५ एकर वनखात्याच्या जमिनीवर १,६०,००० मिश्र व १०,००० बांबू रोपांची लागवड करणेत आलेली आहे. महानगरपालिका नागरी वनीकरणामध्ये रस्त्याच्या दुतर्फा आर्थिक, शैक्षणिक संकुल, गृहसंकुले, मोकळया जागा, उद्याने, मैदाने, स्मशानभूमी परिसर, शासकीय मोकळया जागेवर वृक्षारोपण करुन संवर्धन करणेसाठी संवर्धन करणेसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. मात्र वाढत्या नागरीकरणामुळे रस्ते, गटारांचे रुंदीकरण करतांना लावलेले वृक्ष बाधित होतात. त्याचबरोबर गृहसंकुलांमध्ये वृक्ष लागवडीनंतर काही काळानंतर वृक्षांची मुळे संकुलातील इमारती, पाण्याच्या टाकी, सेप्टीक टँक, पाण्याची लाईन, गटार-चेंबर्स या क्षेत्रात पोहोचून बाधित होतात. त्यामुळे गृहसंस्था सदर वृक्ष तोडण्यासाठी महानगरपालिकेकडे अर्ज दाखल करतात. या बाबी सुध्दा निदर्शनास येत आहेत. या सर्व अडचणींचा अभ्यास करता शहरात वनीकरण करणेसाठी सर्वेक्षण करणेबाबत प्रस्तावावर कार्यवाही होत आहे. महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हजारो हेक्टर पसरलेल्या अवनत वनक्षेत्रावर मुख्यत: वसई, नालासोपारा, विरार या रेल्वेमधून पूर्वेस दिसणाऱ्या डोंगरावर वृक्ष लागवड करणे, संवर्धन करणेबाबत त्रिसदस्यीय करारांतर्गत धोरण ठरविल्यास पुढील कार्यवाही करणे सुलभ होईल.

सन २०१४-१५ पावसाळयामध्ये ज्या वनजमिनीवर वृक्ष लागवड करावयाची आहे. त्या जागांचे क्षेत्रफळ व यादीबाबत वनखात्याशी पत्रव्यवहार सुरु आहे. तोपर्यंतच्या काळामध्ये वनखात्याच्या जमिनीवर त्रिसदस्यीय करारांतर्गत वृक्ष लागवड करणे त्यासाठी परिसरामध्ये अशासकीय, सामाजिक, औद्योगिक संस्थांचा आर्थिक सहभाग घेणे वनखात्याच्या जमिनीवर वृक्ष लागवड करुन संवर्धन करणेचा कार्यकाळ निश्चित करणे आवश्यक आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिकेने संपूर्ण हरित शहर करण्यासाठी महानगरपालिकेने धुकटन येथे माहे ऑगस्ट २०१२ अखेर विविध प्रजातींची एकूण ८ लक्ष रोपे तयार करुन घेण्यात आली. सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात २०,५०० झाडांची लागवड ठेकेदारामार्फत शहरात करुन त्याचे संगोपन योग्यरित्या सुरु आहे. तसेच महापालिकेच्या क्षेत्रातील प्रभाग समिती इ या कार्यक्षेत्रातील सुरुची बाग येथे एकूण १०,००० सुरु झाडांची लागवड करुन त्याचे संगोपन योग्यरित्या सुरु आहे. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात संपूर्ण शहरात ३ लक्ष वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यापैकी महापालिकेच्या धुकटन येथील ८ लक्ष रोपांपैकी संपूर्ण २,५७,३४९ वृक्ष ठेकेदारामार्फत लागवड करण्यात आलेली आहे. उर्वरीत

वृक्षांची लागवड सुरु आहे. सदर लागवड करण्यात आलेल्या वृक्षांसाठी लोखंडी ट्रीगार्डची व्यवस्था करुन एकूण ४४,१९५ लोखंडी ट्रीगार्ड बसविणेत आलेले आहेत. लागवड करण्यात आलेल्या सर्व वृक्षांचे योग्यप्रकारे संगोपन सुरु आहे. लागवड करण्यात आलेल्या वृक्षांपैकी मृत पावलेल्या वृक्षांची जागी नविन वृक्ष लावण्याबाबत ठेकदोर यांना सूचना देऊन १००% वृक्ष जिवंत कसे राहतील याची दक्षता घेण्यास सूचित करण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेच्या क्षेत्रालगत असलेल्या वन क्षेत्रात सन २०१४ हंगामात ४७ हेक्टर अवनत क्षेत्रामध्ये ७७,८५० वृक्ष रोपांची लागवड करुन त्यांची जोपासना योग्यरित्या सुरु आहे. सन २०१३ हंगामात ७८ हेक्टर अवनत क्षेत्रामध्ये १,५०,००० रोपांची लागवड केली असून त्यांचीही जोपासना योग्यरित्या सुरु आहे. लागवड करण्यात आलेल्या वृक्षांपैकी मृत पावलेल्या वृक्षांची जागी नविन वृक्ष लावण्याबाबत ठेकेदार यांना सूचना देऊन १००% वृक्ष जिवंत कसे राहतील याची दक्षता घेण्यास सूचित करण्यात आलेले आहे. अशाप्रकारे महापालिकेने १२५ हेक्टर अवनत क्षेत्रावर त्रिपक्षीय करारान्वये वृक्ष लागवडीचे काम पूर्ण केलेले आहे.

धुकटन रोपवाटीकेतील सुमारे ८ लक्ष रोपापैकी माहे जून २०१५ अखेर १,५२,१९२ रोपे शिल्लक असून सदर शिल्लक असलेल्या रोपांची लागवड अवनत क्षेत्र, शहरातील विविध संस्था, गृहनिर्माण संस्था, मंदिर, शाळा यांच्या मार्फत लागवड करुन घेण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

सन २०१६-१७ या वित्तीय वर्षामध्ये महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील ७ ठिकाणी वनखात्याच्या ४० हेक्टर वर वनीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्य वनसंरक्षक यांच्याकडून प्रस्ताव मंजूरी नुसार वृक्षारोपण करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिका ही क्षेत्रफळाच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेनंतर दुसरी मोठी महानगरपालिका आहे. शहराची सुंदरता ही येथिल वृक्ष , उद्याने, तलाव, नैसर्गिक जागा हयावर अवलंबून असते. सध्या शहराचा विकास अतिशय जोमाने होत असून कॉंक्रीटीकरण, औद्योगिकरण जोराने वाढत आहे. त्यामुळे होणारा प्रदूषणाचा त्रास, शहराचा होणारा विकास शहरातील नैसर्गिक साधनसंपत्तीला अतिशय हानीकारक आहे.

शहराची जैवविविधता तपासणे व ती येणाऱ्या २५ वर्षात होणाऱ्या शहराच्या वृध्दीतसुध्दा कायम रहावी व त्यामध्ये निसर्गाच्या दृष्टीने उत्तम असे प्रकल्प राबविणेसाठी शहराचा जैवविविधता आराखडा

बनविणे व तो शहर विकास आराखडयात अंतर्भूत करणे गरजेचे असून त्यादृष्टीने योग्य पावले उचलणे काळाची गरज आहे

देशपातळीवर जैवविधिता आराखडा बनविणेत येत असून स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या पातळीवरदेखील असा जैवविविधता आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे अशा कार्यक्रमाला महत्त्व प्राप्त होत आहे. त्यानुसार महानगरपालिकेने याबाबतची कार्यवाही सुरु केलेली आहे.

वसई - विरार शहर महानगरपालिका संपूर्ण क्षेत्रात आतापर्यंत ११,३१,४९० वृक्षगणना करण्यात आलेली असून उर्वरीत वृक्षगणनेचे कामकाज सुरु आहे. शहरातील एकूण ९७ उद्यानांचे तांत्रिकदृष्टया देखभालीचे कामकाज करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

## धुकटन येथील मनपा मालकीच्या रोपवाटीकेमध्ये नव्याने रोपांची निर्मिती करणे -

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मौजे-धुकटन ता. पालघर येथील जलशुध्दीकरण केंद्रातील जागेमध्ये रोपवाटीका विकसीत करण्यात आली आहे. या रोपवाटीकेमध्ये मा. स्थायी समिती सभा दि. ०६/०६/२०१२ ठराव क्र. २७२ अन्वये सावे ट्री प्लान्टेशन सर्विसेस या ठेकेदारांची लघुत्तम निविदा मान्य करुन जा.क्र. ७४/१२ दि. ०७/०६/२०१२ अन्वये आवश्यक रोपांची निर्मिती करणे व लागवड करेपर्यंत संगोपन करण्यचे काम नेमून देण्यात आले आहे. आजतागायत या रोपवाटिकेमध्ये मोह, ग्लिरी सिडीया, काळा जांभूळ, फणस, अर्जुन, शिसव, करंज, कडुलिंब, काजु, पळस, गुलमोहर, टेंबुर्णी, रायन, करवंद, बहावा, बिवळा, रायरिड, खजूरी, करडा, सिताफळ, कपोक, कुडा, कवटा, सागरगोटा, आपटा, रीठा, खैर, रक्तचंदन, कैलासपती, कंचन टेटयू, बेल, कसोंबी सीताअशोक, डाळिंब, तमण, कलिंग्रा, वॉटरब्रश, गोल्डन, धुरांडा, हेबिसकस, बोगनवेल, बकुळ, शमी, आपुरा, पोर्तुलका, भेंडी, नेवर, अशोक, तुळस, अडुळसा, फायकस, बदाम, कोहोरेल, एकलिफा, क्युलेईसा या जातीची एकूण ७.९० हजार रोपे तयार करुन त्यापैकी त्रिपक्षीय करारांतर्गत शिरगांव, कणेर व चंदनसार येथील कंपार्टमेंट क्र. ११३० व ११३१ मधील ३१५ एकर वन जमिनीवर १,७०,००० वृक्षांचे रोपणीचा कार्यक्रम केला आहे. अ, ब, क, ड व इ प्रभाग कार्यक्षेत्रामध्ये नागरिक, शाळा, महाविद्यालय व काही संस्था यांना १६,९०० वाटप करुन लागवड करणेत आले आहे व अधिकाधिक वृक्षारोपण करावयाचे आवाहन करण्यात आले आहे.






महापालिकेने अवनत क्षेत्राचे वनीकरण अंतर्गत अधिकाधिक वन जमिनीवर, शासकीय जमिनीवर मोठया प्रमाणात लागवड करुन नैसगिर्क साधन संपत्ती व सौंदर्य वाढविण्यासाठी पर्यावरण संरक्षण दृष्टीकोनातून भरीव कार्य करण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने येत्या दोन वर्षांमध्ये प्रती वर्ष किमान २५० एकर वन जनिमीवर वृक्षारोपण करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात येत आहे.



उपलब्ध पैकी ३ लक्ष रोपे या वर्षीच्या जून महिन्यामध्ये वनखात्याने मान्य करावयाच्या प्रस्तावित जागेमध्ये वृक्षारोपण करण्यासाठी वापरता येईल. त्याचबरोबर डोंगरावरील वनजमिनीवर करण्यात येणाऱ्या लागवडीच्या वृक्षांना पावसाळया व्यतिरिक्त ८ महिने पाणी उपलब्ध नसल्याने उन्हाळयातील प्रखर प्रकाश पाहता २० ते ३०% वृक्षांचा मृत्युदर अपेक्षित आहे. त्यामुळे साधारणतः ९०,००० वृक्षांचा वापर होणार आहे. पुढील वर्षी दोन लक्ष रोपांची नागरी वनीकरणासाठी लागवड करणेबाबत प्रस्ताव आहे व दरवर्षी किमान २ लक्ष रोपे असे ५ वर्षे भरीव वृक्षलागवडीचा कार्यक्रमासाठी रोपे उपलबध असणे गरजेचे आहे. त्यामुळे नवीन रोपे तयार करणेसाठी स्थानिक नैसर्गिक प्रजातींचा विचार करुन सर्वसमावेशक बाबींचा खालील प्रमाणे प्रस्तावास मान्यता देणे आवश्यक आहे. या प्रकारे अभ्यास करता ५,९०,०००/- वृक्षांमधून अ) ३ लक्ष यावर्षी अवनत वनक्षेत्रावरील लागवड ब) उन्हाळयातील भटकीमुळे व मरअळीमुळे ९०,००० वृक्ष क) या वर्षी २ लक्ष शहरात वाटप व लागवड ड) पुढील वर्षी २ लक्ष रोपांची अवनत वन क्षेत्रावरील लागवड इ) पुढील ५ वर्षांसाठी दरवर्षी किमान २ लक्ष रोपांची निर्मिती करणे.







## ✣ भाग - ११ ✣

# महापालिकेचे उपक्रम व योजना

## परिवहन सेवा

वसई विरार शहर महानगरपालिकेची B.O.O.M. (BUY, OWN, OPERATE & MAINTAIN) तत्वावर रॉयल्टी बेसिसवर परिवहन सेवा दिनांक ०३.१०.२०१२ पासून सुरु झालेली आहे. सदरची सेवा मे. भागिरथी ट्रान्स कार्पो. प्रा.लि. मुंबई हयांचे मार्फत सुरु करण्यात आलेली आहे. हया उपक्रमासाठी महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारचा खर्च करणेत आलेला नसून परिवहन सेवेसाठी आवश्यक बसेस, इंधन, कर्मचारी वर्ग, बसेसची देखभाल व दुरुस्ती इत्यादीसाठी होणारा खर्च संबंधित बस ऑपरेटर हयांचेमार्फत करणेत येत आहे. महानगरपालिकेकडून संबंधित उपक्रमासाठी बस डेपोसाठी व बस थांब्याची जागा उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे.

**परिवहन सेवेचा तपशील :**

| | | |
|---|---|---|
| १. | परिवहन सेवेची सुरुवात | दिनांक ०३.१०.२०१२ |
| २. | परिवहन सेवेसाठी मंजूर बस | ३८० बसेस |
| ३ | परिवहन सेवेसाठी मंजूर मार्ग | ४८ मार्ग |
| ४ | परिवहन सेवेच्या सुरुवातीस सुरु बसेसची संख्या | ३० बसेस |
| ५ | सद्यस्थितीत सुरु असलेल्या बसेसची संख्या | १२० बसेस |
| ६ | मंजूर मार्गापैकी परिवहन सेवेच्या सुरुवातीस बस सेवा सुरु केलेल्या मार्गाची संख्या | ९ मार्ग |
| ७ | सद्यस्थितीत मंजूर मार्गापैकी बससेवा सुरु असलेल्या मार्गाची संख्या | २८ मार्ग |
| ८ | प्रस्तावित नवीन मार्गाची संख्या | १०१ मार्ग |

सदर परिवहन सेवेमध्ये अपंगांना ७५% जेष्ठ नागरिकांना ५०% आणि शाळकरी मुलांना ६६.३३% सवलत महानगरपालिकेमार्फत देण्यात येत आहे.

केंद्र शासनाकडील JnNURM योजनेअंतर्गत महापालिका परिवहन सेवेसाठी ३४६ बसेस खरेदी करण्याकरीता सादर केलेला पकल्प अहवाल केंद्र शासनाकडून मंजूर झालेला आहे. सदर प्रकल्पामध्ये ३४६ बसेससाठी १३१.३६ कोटी, तीन बस डेपो व संगणकीय तंत्रज्ञान विकसित करणे हया कामासाठी

३५.८६ कोटी असे कएूण १६७.२२ कोटी रुपये रकमेची मंजूरी प्राप्त झालेली आहे. हयापैकी बसेस खरेदी करिता केंद्र व राज्य शासनाकडून ९६.४५ कोटी तसेच बस डेपो व संगणकीय तंत्रज्ञान विकसित करणे कामाकरीता २५.१० कोटी असे एकूण रुपये १२१.५५ कोटी रुपये अनुदान प्राप्त होणार आहे. एकूण ३४६ बसेस खरेदीकरीता महानगरपालिकेकडून निविदा मागविण्यात आलेल्या असून पहिल्या टप्प्यामध्ये मंजूर बस संख्येपैकी Non AC Mini Bus ७० नग व Non AC Standard Bus २० नग असे एकूण ७० बसेससाठी मे. अशोक लेलॅण्ड कंपनी हयांना व Non AC Mini Bus १० नग बसेससाठी मे. टाटा मोटर्स हयांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. तसेच दुसऱ्या टप्प्यामध्ये Non AC Mini Bus ७८ नग व Non AC Standard Bus ३२ नग असे एकूण ११० बसेससाठी मे. अशोक लेलॅण्ड कंपनी हयांना व Non AC Mini Bus १० नग बसेससाठी मे. टाटा मोटर्स हयांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. अशा एकूण २२० बसेस खरेदी करणेत आलेल्या असून लवकरच काही बसेस परिवहन सेवेमध्ये दाखल होणार आहेत. तसेच अत्याधुनिक सुविधांचा समावेश असलेले २ मोठे बस डेपो बांधकामासाठी निविदा मागविण्यात आलेल्या असून दोन्ही बस डेपोसाठी सुमारे ८० कोटी खर्च अपेक्षित आहे. लवकरच बस डेपोचे बांधकाम सुरु होणार आहे.

सदरच्या बसेस एस.टी. पेक्षा अधिक आरामदायी व प्रवाशांना आनंद मिळेल अशा प्रकारे बांधण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे बसमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केलेला असून प्रत्येक बसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्याद्वारे बसमधील प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर लक्ष ठेवण्यात येते. ज्यामुळे चोरी, लुटमार, घातपात अशा प्रकारच्या घटनांवर प्रतिबंध घालता येईल. तसेच प्रत्येक बसला जीआरएस यंत्रणा जोडण्यात आलेली आहे. परिवहन सेवेची सेवा सकाळी ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत सुरु आहे. वसई विरार शहरातील अरुंद रस्त्याचा विचार करुन मिनी बसना प्राधान्य देण्यात आलेले आहे.



व्हीव्हीसिएमसी बसमध्ये प्रवास करणाऱ्या अपंग नागरिक व विद्यार्थी यांना शासनाच्या नियमानुसार तिकीट दरात ५० टक्के सवलत देण्यात आलेली आहे. अहिल्यादेवी होळकर योजनेच्या धर्तीवर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळकरी मुलींना शाळेत जाण्यायेण्यासाठी मोफत प्रवासाची सोय उपलब्ध आहे. यात मुलींना पास देण्यात येतो. व सदरचा खर्च महानगरपालिकेमार्फत संबंधित परिवहन ठेकेदारास अदा करण्यात येतो. परिवहन सेवेच्या बस उभ्या करण्यासाठी नवघर पूर्व, नालासोपारा या ठिकाणी बस डेपो बांधण्यात आले असून लवकरच विरार येथे बस डेपोचे काम सुरु होणार आहे. या सेवेअंतर्गत महापालिकेने राज्य परिवहन मंडळाकडून ४८ बसमार्गाची मंजूरी घेतली असून टप्प्याने २०१४ पर्यंत एकूण ३००० बसेस शहरातील रस्त्यावर धावू लागतील. भविष्यात लगतच्या ग्रामीण भाग व शहरापर्यंत बससेवा सुरु करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.

वसई तालुक्याची भौगोलिक परिस्थिती, झपाटयाने होणारे शहरीकरण व वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन मा. लोकनेते श्री. हितेंद्र ठाकूर व प्रथम महापौर श्री. राजीव पाटील यांची सर्वसामान्य नागरिकांच्या जीवित रक्षणाची काळजी घेण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेचे सुसज्ज अग्निशमन दल निर्माण केले आहे.

महानगरपालिकेचे अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करण्याकरीता विविध आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीने आचोळे, नालासोपारा पूर्व येथे सुसज्ज असे मुख्य अग्निशमन केंद्र बांधले आहे. तसेच अत्याधुनिक अग्निशमन वाहने व उपकरणे खरेदी केली आहेत. त्यात अरुंद रस्ते, गल्ल्या येथील वस्त्यांमध्ये आगी विझवण्यासाठी उपयुक्त १ क्विक रिस्पॉन्स व्हेईकल, मोठया प्रमाणात लागलेल्या आगीसाठी २ वॉटर बाउजर, औद्योगिक व रासायनिक आगी विझवण्यासाठी १ फोम टँकर, भूकंप, नैसर्गिक आपत्ती अपघात इ. कारणाने घडलेल्या घटनांवर मदतकार्य करण्यासाठी १ इमर्जन्सी रेस्कू व्हेईकल, अरुंद रस्ते, गल्ल्या, बैठका चाळी, छोटी गावे इ. ठिकाणी लागलेल्या आगी विझवण्यासाठी ४ मिनी वॉटर टँकर नागरी वस्त्यामधील व औद्योगिक वसाहतीत लागलेल्या आगी विझवण्यासाठी ७ वॉटर टँकर आपत्कालीन परिस्थितीत प्रकाश योजनेसाठी ४ इन्फ्लाटेबल लाईट, पूरग्रस्त परिस्थितीत मदतकार्य पुरवण्यासाठी २ रेस्क्यू बोटी, ३ आरसीसी कटर, २ वूड कटर, ३ स्टील कटर इ. उपकरणे खरेदी केली आहेत. न्यूमॅटीक पिलो, थमर्ल कॅमेरा, प्लोट पंप, हायड्रॉलीक जॅक्स, सबमर्सिबल पंपस , ब्रिदींग ॲपरेटस, केमिकल सूट, फायर सूट, ड्रायव्हींग सूट अशी अनेकविध महत्त्वाची उपकरणे आज आपल्या अग्निशमन दलाच्या ताफ्यात आहेत.

मागील वर्षी सप्टेंबर महिन्यात वसई विरार महानगरपालिका अग्निशमन दलात जगविख्यात रोझेनब्युअर कंपनीचे युरोपातील ऑस्ट्रीयाहून आयात केलेले जर्मन तंत्रज्ञानाचे ४२ मीटर उंची गाठणारे ५ कोटी ४१ लाख किंमतीचे अत्याधुनिक टर्न टेबल लँडर खरेदी केलेले आहे. या टर्न टेबल लँडरची वैशिष्टये म्हणजे कुठल्याही स्वरुपातील रस्ता, चिखल किंवा अडचणीच्या जागेत हे मशीन स्वत: स्वयंचलित संगणकीय प्रणालीद्वारे स्वत: स्थिर करते. तसेच या मशीनचे लँडर ३६० डिग्रीत कुठल्याही अँगलमध्ये काम करु शकते. त्यास खास वैशिष्टय असे की हे २० डिग्रीत देखील काम करु शकते. वेळ पडल्यास हे मशीन क्रेनचेह काम ठरावीत क्षमतेपर्यंत करु शकते. मंत्रालयात लागलेल्या आगीच्या मोहिमेत अशाच स्वरुपाच्या गाडीने मंत्रालयाची मोहीम फत्ते केली आहे.

एवढया कमी कालावधीत इतके सुसज्ज अग्निशमन दल उभे करणारी वसई विरार महानगरपालिका संपूर्ण भारतात पहिलीच महानगरपालिका ठरलेली आहे. ही सर्व वाहने व अग्निशमन साहित्य उपकरणे महापालिकेकडे आज हाती आहेत. त्यामुळे कुठल्याही प्रकारची दुर्घटना, अपघात झाल्यास महानगरपालिकेकडे आज सुसज्ज अशी अग्निशमन यंत्रणा अस्तित्वात आहे. सद्यस्थितीत विरार मुख्यालय, विरार पूर्व प्रभाग समिती क नालासोपारा, आचोळे मुख्य अग्निशमन केंद्र प्रभाग समिती, ड नवघर-माणिकपूर व वसई गाव येथे अग्निशमन केंद्रे आहेत.







आग, भूकंप, नैसर्गिक आपत्ती, अपघात यासारख्या दुर्घटना झाल्यास त्या त्या ठिकाणी अग्निशमन विभागाची वाहने व उपकरणे घटनास्थळी वेळेवर पोहोचण्याकरीता महापालिका हद्दीत एकूण २ कोटी ७० लाख रकमेची नवीन अग्निशमन केंद्रे ही नर्सरी बाग, वसई गाव, दिवाणमान १०० फुटी रोड, सातिवली, वालीव, श्रीप्रस्थ नालासोपारा येथे उभारण्यात येणार असून महानगरपालिकेमार्फत त्यांची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे व लवकरच ती आपणांस मूर्त स्वरुपात दिसणार आहे.

## ✣ मॅरेथॉन स्पर्धा ✣





वसई विरार महानगरपालिकेच्या राज्यस्तरीय महापौर मॅरेथॉनच्या दोन यशस्वी प्रयत्नानंतर या वर्षी देखील पुन्हा एकदा वसई विरार महानगरपालिका आणि वसई तालुका कलाक्रिडा विकास मंडळाकडून राज्यस्तरीय महापौर मॅरेथॉन स्पर्धा २१ डिसेंबर २०१४ रोजी आयोजित करण्यात आली होती.

सदर स्पर्धा एएफआय द्वारे मान्यता प्राप्त असून २० लाखांचे बक्षीस जाहिर करण्यात आले होते. ५० वर्षांवरील वय असणाऱ्या पुरुष आणि महिलांसाठी पूर्व मॅरेथॉन आणि अर्धी मॅरेथॉन चे आयोजन केलेले होते. अनिवार्य वेळेत पूर्ण मॅरेथॉन आणि अर्धी मॅरेथॉन पार पाडण्यात आली होती. ऑनलाईन आणि प्रत्यक्ष नोंदणी ८ सप्टेंबर २०१४ पासून ते २५ ऑक्टो २०१४ पर्यंत चालू होती.

तसेच आधीच्या गतवर्षी सुध्दा राज्यस्तरिय मॅरेथॉन स्पर्धेचा मान मिळाल्यानंतर वसई विरार च्या महापौरांनी ऑक्टोबर मध्ये वसई विरार मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले होते. मॅरेथॉन स्पर्धेसाठी १७ लाखांचे बक्षीस ठेवण्यात आले होते. तसेच पुरुष मॅरेथॉन साठी बक्षीससाठी रक्कम दुपट्टीने २ लाखांपर्यंत ठेवण्यात आले होते. मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजक वसई विरार शहर महानगरपालिका आणि वसई तालुका कला क्रिडा विकास मंडळाने पुरुष मॅरेथॉन आणि महिला अर्धी वर्षा स्पर्धेत विजेत्यांसाठी १ लाख रुपये बक्षीस आयोजित केलेले होते. मॅरेथॉन स्पर्धेचे बक्षीस हे रोख रक्कमेच्या स्वरुपात १० क्रमांकापर्यंत निश्चित वयोगटातील स्पर्धकांना देण्यात आले.

आर्मी, रेल्वे किंवा इतर संस्थेतील आघाडीचे धावपट्टू या वर्षी मॅरेथॉन स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकतात. आर्मी धावपट्टू निरज पाल, जी लक्ष्मण हे पुरुष मॅरेथॉनचे विजेते ठरले. तसेच ONGC च्या कविता राऊत यांनी मागील स्पर्धेचे रेकॉर्ड तोडून विजेत्या ठरल्या.








MAYOR'S MARATHON 2014
युनियन बैंक Union Bank
PAY
रुपये RUPEES
एक लक्ष मात्र
साठ हजार मात्र
VASAI VIRAR SHAHAR MAHANAGARPALIKA - MAHAPOUR MARATHON
मुख्य लेखा अधिकारी
आयुक्त
2
1
3


VASAI-VIRAR CITY MUNICIPAL CORPORATION
MAYOR'S MARATHON 2014
4th National
युनियन बैंक Union Bank
PAY
रुपये RUPEES
दोन लक्ष मात्र
₹ २,००,०००/-
VASAI VIRAR SHAHAR MAHANAGARPALIKA - MAHAPOUR MARATHON
मुख्य लेखा अधिकारी
आयुक्त
2
1
3

## ✣ योजना ✣

वसई विरार शहर महानगरपालिकेने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक स्तुत्य अशा उपाययोजना राबविल्या. रेन वॉटर हार्वेस्टींग हा त्याच उपाययोजनांचा भाग आहे. महापालिकेने सर्व बांधकाम व्यवसायिकांना त्यांच्या प्रोजेक्टमध्ये रेन वॉटर हार्वेस्टींगची उपयायोजना करण्यास बंधनकारक केले आहे. व याची योग्य पाहणी व अंमलबजावणी देखील केली जाते.

वसई विरार शहर महानगरपालिकेने टेक्नोइंडिया या संस्थेच्या सहाय्याने महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार (जी.आर. नंबर टी.बी.पी. ४३२००१/२१३२/सीआर२३०/०१/युडी/११) रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प यशस्वीरित्या राबविले आहेत. याच उपाययोजनेअंतर्गत महापालिका क्षेत्रात आत्तापर्यंत ३०० हून अधिक रेन वॉटर हार्वेस्टींग योजना राबविलेली आहे.




### भविष्यकालीन योजना :

वसई विरार महानगरपालिकेने घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी Sewage Treatment Plant बांधणे बंधनकारक केले आहे.

# ✣ पाणी पुरवठा योजना ✣

## नगरोत्थान महाअभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव १०० द.ल.लि. वसई विरार पाणी पुरवठा योजना (सूर्या) टप्पा - ३

**अ) योजनेचा तपशील :**

| | | |
|---|---|---|
| १) | योजनेचे नांव | **नगरोत्थान महाअभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव १०० द.ल.लि. वसई विरार पाणी पुरवठा योजना (सूर्या) टप्पा - ३** |
| २) | प्रशासकीय मान्यता | शासन निर्णय नगरो/२०१३/प्रक्र-३०७/नवि-३३, दिनांक २७.०१.२०१४ |
| ३) | तांत्रिक मान्यता | मजीप्रा/मु.अ. (प्रव्यससे/तांशा-१/१४०६, दि. ०८/०७/२०१३ |
| ४) | योजनेची एकूण किंमत | रु. २८१.६३ कोटी (ढोबळ) |
| ५) | योजनेची मंजूर किंमत | रु. २६९.७९ कोटी |
| ६) | वित्तीय आकृतीबंध | अनुदान रु. १३४.८९५३ कोटी<br>महानगरपालिका रु. १३४.८९५३ कोटी<br>एकूण रु. २६९.७९०६ कोटी |
| ७) | लोकवर्गणी मध्ये सुट देण्यात आली असल्यास, त्याबाबतचे शासनाचे पत्र क्रमांक व दिनांक व त्यानुसार अनुज्ञेय लोकवर्गणीची रक्कम | लागू नाही. |
| ८) | मंजूर योजनेंतर्गत उपांगे | १) सूर्या नदीवर बंधारा बांधणे.<br>२) मासवण येथील बंधारा दुरुसत करणे.<br>३) आर.सी.सी. संप व पंपहाऊस बांधणे<br>४) प्रक्रियापूर्व पाण्याचे मासवण ते जलशुध्दीकरण केंद्राकरीता उर्ध्ववाहिनी अंथरणे (४.६० कि.मी.)<br>५) प्रक्रियापूर्व पाण्याची पंपींग मशीनरी |

| | | |
|---|---|---|
| | | ६) जलशुध्दीकरण केंद्र बांधणे (१४० द.ल.लि.)<br>७) प्रक्रियोत्तर पाण्याची उर्ध्ववाहिनी (२८.०० कि.मी.)<br>८) प्रकियोत्तर पाण्याची पंपींग मशीनरी<br>९) प्रक्रियोत्तर पाण्यची झोनल लिडींग मेन<br>१०) नालासोपारा येथे रेल्वे क्रॉसींग<br>११) नॅशनल हायवे क्रॉसींग (५ जागी)<br>१२) फुटकळ कामे जसे एम.एस.सी.बी. चार्जेस स्टाफ क्वार्टर्स रोड व इत्यादी. |
| ९) | उद्‌भव | सूर्या उद्‌भव |
| १०) | पाणी आरक्षणाची/पाणी उचल परवान्याची सद्य:स्थिती | सदयस्थितीत सूर्या नदीतून १०० द.ल.लि. प्रतिदिनी |
| ११) | प्राप्त लोकवर्गणी रक्कम | लागू नाही. |
| १२) | अ) योजनेत समाविष्ठ असलेल्या उपांगासाठी लागणारी जागा उपलब्ध आहे काय ?<br>ब) भूसंपादनाबाबतची सद्य: स्थिती. | होय.<br>योजनेसाठी लागणाऱ्या सर्व जागा महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे. पाईप लाईन जागेबाबतचा पत्रव्यवहार सुरु आहे. |
| १३) | कार्यर्व्ययी अंदाजपत्रकाची ढोबळ किंमत | रु. २६९.७९ कोटी |
| १४) | तांत्रिक मुल्यमापन | आय.आय.टी. पवई या संस्थेचे दि. १८/०७/२०१३ चे पत्रानुसार तांत्रिक मुल्यमापन प्राप्त. |

**ब) निविदा प्रक्रिया बाबतचा तपशील :**

**१) निविदेत समाविष्ट कामे :**

| अ.क्र. | उपांगांची नोव | निविदेमधील किंमत रुपये |
|---|---|---|
| १. | मासवण येथे हेड वर्क्स बांधणे, शुध्द व अशुध्द पाण्याची पंपींग मशीनरी पुरविणे, संप व पंपहाऊ स बांधणे, धुकटण येथे १४० द.ल.लि. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र बांधणे, उर्ध्ववाहिनी/ गुरुत्व वाहिनी / लिडींग मेन/एम.एस. पाईप टाकणे, अंथरणे, जोडणे. | २२६,२९,३४,२२४/- |
| | **निविदेतील कामांची एकूण अंदाजित किंमत** | **२२६,२९,३४,२२४/-** |

**२) ई -निविदेची ठळक माहिती :**

<table>
<tr><td>१)</td><td>निविदेप्रमाणे अंदाजित किंमत</td><td colspan="4">रु. २२६,२९,३४,२२४/-</td></tr>
<tr><td>२)</td><td>दरसूची</td><td colspan="4">सन २०१२-१३</td></tr>
<tr><td>३)</td><td>निविदेची इसारा रक्कम</td><td colspan="4">रु. २,२६,२९,३४२/-</td></tr>
<tr><td>४)</td><td>सुरक्षा अनामत रक्कम</td><td colspan="4">५% (अंदाजित किंमत किंवा स्विकृत किंमत यापैकी जास्तीचे किंमतीनुसार)</td></tr>
<tr><td>५)</td><td>निविदेचा प्रकार (बी-१)</td><td colspan="4">बी-१</td></tr>
<tr><td>६)</td><td>निविदेत नमुद करण्यात आलेल्या कामाचा विहीत कालावधी</td><td colspan="4">१५ महिने (पावसाळयासहीत )</td></tr>
<tr><td>७)</td><td>टेंडर वेबसाईट वरून डाऊन लोड करण्याचा विहीत कालावधी</td><td colspan="4">दि. २१/०१/२०१४ ते १४/०२/२०१४</td></tr>
<tr><td>८)</td><td>निविदा पूर्व बैठकीचा दिनांक व ठिकाण</td><td colspan="4">दि. २९/०१/२०१४ आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका विरार या बैठकीत १६ ठेकेदार सहभागी झाले होते.</td></tr>
<tr><td>९)</td><td>निविदा पूर्व बैठकीचे इतिवृत्त निर्गमित केलेल्या पत्राचा क्रमांक व दिनांक</td><td colspan="4">निविदा पूर्व बैठकीचे इतिवृत्त वसई विरार शहर मनपाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले होते.</td></tr>
<tr><td>१०)</td><td>निविदा स्विकारण्याचा दिनांक</td><td colspan="4">इि. १५/०२/२०१४</td></tr>
<tr><td>११)</td><td>निविदा उघडल्याचा दिनांक व ठिकाण</td><td colspan="4">दि. २०/०२/२०१४, आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका विरार</td></tr>
<tr><td rowspan="5">१२)</td><td rowspan="5">निविदा सुचना प्रसिध्दीस दिलेल्या वृत्तपत्रांची नावे व दिनांक</td><td>अ. क्र.</td><td>वृत्तपत्र</td><td>दिनांक</td><td>वर्गवारी (जिल्हा/ राज्य स्तर)</td></tr>
<tr><td>१</td><td>दै. टाईम्स ऑफ इंडिया</td><td>२०/०१/२०१४</td><td>राष्ट्रीय इंग्रजी वृत्तपत्रात</td></tr>
<tr><td>२</td><td>दै. सकाळ</td><td>२०/०१/२०१४</td><td>राज्यस्तरीय मराठी</td></tr>
<tr><td>३</td><td>दै. लोकमत</td><td>२०/०१/२०१४</td><td>राज्यस्तरीय मराठी</td></tr>
<tr><td>४</td><td>दै. महानगर</td><td>२०/०१/२०१४</td><td>जिल्हास्तरीय मराठी</td></tr>
<tr><td>१३)</td><td>निविदा डाऊ नलोड करुन घेतलेल्या ठेकेदारांची संख्या</td><td colspan="4">३ (तीन)</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १४) | निविदा विकत घेतलेल्या ठेकेदारांची नावे | १) मे. लारसन ॲनड टुब्रो, चेन्नई.<br>२) मे. एस.एम. ईंफ्रा प्रा.लि. ठाणे.<br>३) मे. घारपूरे इंजिनिअरींग, पुणे. |
| १५) | पूर्व अर्हता प्राप्त ठेकेदारांची नावे | १) मे. लारसन ॲनड टुब्रो, चेन्नई.<br>२) मे. एस.एम. ईंफ्रा प्रा.लि. ठाणे.<br>३) मे. घारपूरे इंजिनिअरींग, पुणे. |
| १६) | निविदा सादर केलेल्या ठेकेदारांची नावे | १) मे. लारसन ॲनड टुब्रो, चेन्नई.<br>२) मे. एस.एम. ईंफ्रा प्रा.लि. ठाणे.<br>३) मे. घारपूरे इंजिनिअरींग, पुणे. |
| १७) | निविदा उघडण्याच्या प्रक्रियेत अपात्र ठरविण्यात आलेल्या ठेकेदारांची नावे व त्याबाबतची कारणे | - |
| १८) | निविदा देकार ग्राहयता कालावधी | १२० दिवस<br>(दि. १५/०२/२०१४ ते १४/०६/२०१४ पर्यंत) |

**३) उघडण्यात आलेल्या निविदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.**

निविदेची किंमत रुपये २२६,२९,३४,२२४/-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | देकाराची टक्केवारी | बोलीची किंमत | बोलीचा क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १) | मे. घारपूरे इंजिनिअरींग, पुणे. | ३९.६०% अधिक | ३१५,९०,५६,१७७ | १ |
| २) | मे. एस.एम. ईंफ्रा प्रा.लि. ठाणे. | ४४.१०% अधिक | ३२६,०८,८८,२१७ | २ |
| ३) | मे. लारसन ॲनड टुब्रो, चेन्नई. | ४५.७२% अधिक | ३२९,७५,४७,७५१ | ३ |

**४) सर्वात कमी रकमेचा प्राप्त झालेला देकार :**

या निविदेसाठी मे. घारपुरे इंजिनिअरींग, पुणे यांचा देकार सर्वात न्युनतम असून निविदेतील अंदाजित किंमतीवर तो ३९.६०% जादा दराचा प्राप्त झाला आहे. त्या अनुषंगाने कंत्राटदाराच्या देकाराची किंमत रु. ३१५,९०,५६,१७७/- येते.

# ✣ समारोप ✣

प्रदूषण नियंत्रणाच्या मोहिमे अंतर्गत, जनजागृतीचे व लोकशिक्षणाचे काम विविध पातळीवर विविध माध्यमातून राबविण्यात यावे यासाठी शाळा, महाविद्यालये, कार्यालये इत्यादीमधून व्याख्याने आयोजित करणे, वृक्षदिंडया काढणे, भित्तीपत्रके लावणे, प्रभात फेऱ्या काढणे, पथनाटयांचे संयोजन करणे, पर्यावरण संतुलन तथा प्रदूषण नियंत्रणासंबंधी शाळा, विद्यालये येथे प्रदर्शन तथा स्पर्धा, निबंध स्पर्धा भरवणे अशा विविध योजना कार्यान्वित केल्या पाहिजेत. पर्यावरणाचे जुने जटील प्रश्न सोडवितानाच नवीन प्रश्न निर्माण होत आहेत.

प्रबळ राजकीय, इच्छाशक्ती, जागृत लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, सजग नागरिक व कुशल प्रशासकांच्या सहकार्याने पर्यावरण संतुलनासाठी वाहून घेतलेली आमची संस्था स्काय लॅब ॲनिलिटीकल लॅबोरॅटरी, कल्याण, सतत आपल्या सेवेस निरपेक्षपणे बांधील असून त्यासाठी लागणारे तांत्रिक सल्ले, माहिती विनामूल्य देण्यास आम्ही सदैव तयार आहोत.

**बी.एस. पानसरे**
संचालक
स्काय लॅब ॲनालिटिकल लॅबोरेटरी
पत्ता : चिंतामणी स्मृती,
पारनाका, कल्याण (प.)
फोन नं. ९८२०३८६७८५, ९८६७५७७३०९

# ✣ विनम्र आवाहन ✣

राज्यघटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्ती खंड २३४ परिच्छेद १२, सन १९९२ महाराष्ट्र राज्य नगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्था सल्लागार अधिनियम १९९४ खंड ६७ (अ) अन्वये महापालिका पर्यावरण सद्यस्थिती अहवाल सादर करीत असून याबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या स्वागतार्ह आहेत.

**वसई विरार शहर महानगरपालिका,**
विरार पूर्व, तालुका : वसई
जिल्हा - ठाणे
पिन - ४०१३०५
दूरध्वनी क्रमांक ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
**स्कायलॅब ॲनालिटिकल लॅबोरेटरी, कल्याण**
**दूरध्वनी क्रमांक - ०२५१ - २०२७०१०/ ९८६७५७७३०९ /१०**

**महापौर** | **सभापती स्थायी समिती** | **आयुक्त**

# स्काय लॅब प्रोजेक्ट टिम

१. श्री. राम पेठे सर

२. श्री. बाळकृष्ण पानसरे

३. श्री. भास्कर किनगे

४. सौ. रंजना अतुल कुलकर्णी

५. श्री. महेश चौधरी

६. डॉ. गणेश भगुरे

७. सौ. प्रज्ञा प्र. पोयेकर

८. कु. सारिका चव्हाण

९. कु. शरण्या शेनॉय

१०. श्री. प्रशांत कांबळे

११. श्री. निवृत्ती वेताळ

१२. श्री. महेश पालांडे

# SKY LAB ANALYTICAL LABORATORY

(ISO Certified)

Approved by MoEF, Accredited by NABL (Govt. of India)




## LAB ADDRESS


**CHINTAMANI SMRUTI APT.**
**1ST FLOOR, OPP.GAJANAN MAHARAJ MANDIR,**
**NEAR PHADAKE HOSPITAL, PARNAKA, KALYAN (W).**
**PHONE NO. 0251- 2027010 MOB - 9867577310,**
**9820386785,9867577309.**
**Web : www.skylabenviro.com , E-mail : mails@skylabenviro.com**


## SERVICES

**Testing of Air / Water / Soil / Hz. Waste / Noise Level**
**AMC & turnkey Projects of WTP / STP / ETP**
**Rain Water Harvest / RO Plant / Vermi Culture / Bio Gas**
**Environmental Survey / EIA Study**
**Liasoning with MPCB**



# हरितक्रांती हाच बहुजन विकास